## हातरिक्षा ओढताना हृदयविकाराचा झटका

**माथेरान** : माथेरानमधील अंबालाल वाघेला हे रविवारी (दि.५) सकाळच्या दरम्यान पर्यटकांना अमानवीय हातरीक्षा ओढताना त्यांची प्रकृती गंभीररित्या बिघडली. त्यांना तात्काळ नगरपरिषदेच्या बी.जे. हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. डॉ. प्रशांत यादव यांनी योग्यरित्या उपचार केल्याने अंबालाल यांची प्रकृती स्थिर होऊ शकली. अंबालाल यांची लक्षणे पाहता हृदय विकाराचा झटका आल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात आले. त्यांना पुढील उपचारासाठी पनवेल येथील एम.जी.एम हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात आले आहे. त्यामुळे या अमानवी प्रथेमुळे आणखी किती चालकांचे जीव धोक्यात टाकायचे, असा संतप्त सवाल हातरिक्षा चालकांकडून विचारला जात आहे.


# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. ७ ऑक्टोबर २०२५

किंमत ४ ₹



सी साईट रिसॉर्ट नागाव बिच येथे कामासाठी अनुभवी मॅनेजर पाहिजे. कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक.

9422856336/9028143980


## वेधक

### चुलत काकाकडून पुतणीवर अत्याचार

**पनवेल :** आईच्या प्रियकराने मुलीवर अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची घटना घणसोली येथे घडली आहे. आईचा प्रियकर हा पीडितेचा चुलत काका असून रबाळे पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. श्रीकांत सुर्यवंशी असे आरोपीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सातारा जिल्ह्यातील बाचोळी येथील रहिवाशी असलेली पीडित अल्पवयीन मुलगी आई-वडील, बहिणी आणि चुलत काकांसोबत नवी मुंबईतील घणसोलीत एकाच घरात राहण्यास होती.एकत्र असतानाच चुलत काका आणि आईमध्ये अनैतिक संबंध असल्याची माहिती पीडित मुलीला मिळाली. त्याबाबत आपल्या वडिलांना पान २ वर

# खड्ड्यांसाठी शेकाप रस्त्यावर

## शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांचा इशारा

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

**खड्डेमय रस्त्यांमुळे अपघाताचे सत्र वाढत आहे. या अपघातांमध्ये जखमी होण्याबरोबरच मृत्यूदेखील होत असून अनेकांना कायमचे अपंगत्व निर्माण होत आहे. या खड्ड्यांमुळे दीड वर्षात सुमारे तीनशेहून अधिक जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. असे असतानाही खड्ड्यांच्या दुरुस्तीकडे प्रशासनासह शासना अक्षम्य दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे नागरिकांच्या हितासाठी खड्ड्यांविरोधात रस्त्यावर उतरणार असल्याचा इशारा शेकाप राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी दिला आहे. मंगळवारी (दि.७) पेझारी चेक पोस्ट येथे पक्षाच्यावतीने रास्ता रोको केला जाणार आहे, असे त्यांनी सांगितले. अलिबागमध्ये सोमवारी (दि.६) घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये त्या बोलत होत्या.**




यावेळी शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे, शेतकरी सभा तालुका अध्यक्ष अनिल पाटील व नागेश कुलकर्णी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, जिल्हा परिषदेच्या अखत्यारित सुमारे ५ हजार किलो मीटर रस्ते आहेत. जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागातांचा विकास केला जातो. परंतु, जिल्ह्यातील ३ हजार किलो मीटरच्या रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. जिल्हा नियोजन समितीकडून २०२३-२४ मध्ये जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाला रस्त्याच्या ३१६ कामांसाठी ४० कोटी ७१ लाख रुपयांची प्रशासकिय मान्यता दिली होती. त्यापैकी ३८ कोटी १२ लाख रुपयांचा निधी वितरित करण्यात आला. मात्र, जून २०२४ अखरेपर्यंत बांधकाम विभागाने रस्त्याच्या दुरुस्तीसह नुतनीकरणासाठी फक्त १६ कोटी रुपयांचा निधी खर्च केला आहे. गतवर्षी करोडो रुपये खर्च करूनही रस्त्यांची अवस्था बिकट झाली आहे. त्यामुळे पान २ वर

### खड्ड्यांमुळे पर्यटनावर परिणाम

- अलिबाग तालुक्यातील रेवदंडा, नागांव, वरसोली, अलिबाग शहर तसेच मुरूड तालुक्यातील काशीद, मुरूड शहर, बोर्ली हे पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाची ठिकाणे आहेत. लाखो पर्यटक या पर्यटन स्थळी येतात. पर्यटनातून स्थानिकांना रोजगार मिळत आहे. परंतु, खड्डेमय रस्त्यांमुळे पर्यटकांची पर्यटनस्थळांकडे पाठ फिरू लागली आहे. अलिबाग-पेण, अलिबाग-रोहा आणि अलिबाग मुरूड मार्गावरील प्रवास 'नको रे बाब', अशी परिस्थित पर्यटकांची झाली आहे. स्थानिकांच्या रोजगारावर त्याचा परिणाम होत आहे, असे चित्रलेखा पाटील म्हणाल्या.

# आज पेझारीत धडकणार लाल वादळ

## खड्डेमय रस्त्याविरोधात शेकापतर्फे रास्ता रोको

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

खड्डेमय रस्त्याविरोधात शेतकरी कामगार पक्षाने लढा सुरु केला आहे. शेकापचे नेते जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी (दि.७) सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास पेझारी तपासणी नाका येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन होणार आहे. त्यामुळे शेकापचे लाल वादळ अलिबाग-पेण मार्गावर धडकणार आहे.

यावेळी शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, शेकाप तालुका महिला आघाडी प्रमुख नागेश्वरी हेमाडे, ॲड. निलम हजारे, वृषाली ठोसर आदी वेगवेगळ्या आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

मंगळवारी अलिबाग-पेण मार्गावरील पेझारी चेक पोस्ट येथे शेकाप कार्यकर्ते जमणार असून सकाळी नऊ वाजता रास्ता रोको आंदोलनाला सुरुवात होणार आहे. ग्रामीण भागासह अलिबाग-पेण, अलिबाग-रोहा, अलिबाग-मुरूड मार्गावरील रस्त्यांचे खड्डे बूजविण्याबाबत शेकापतर्फे अनेक वेळा निवेदन देण्यात आले आहे. मात्र, त्याची ठोस अंमलबजावणी होताना दिसून आली आही. खड्डेमय रस्त्यांमुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. जानेवारी ते सप्टेंबर या नऊ महिन्यांच्या पान २ वर

### भरन्यायालयात सरन्यायाधीशांवर हल्ला

**मुंबई :** अलीकडेच विष्णू मंदिरासंदर्भातील एका प्रकरणाची सुनावणी करत असताना सरन्यायाधीश गवई याचिकाकर्त्याला म्हणाले होते की, तुमची तक्रार असेल तर तुम्ही भगवान विष्णूकडे जा. त्यावर काही लोकांनी, हिंदुत्ववादी संघटनांनी आक्षेप घेत सरन्यायाधीशांवर टीका केली होती. याच वक्तव्याचा संताप व्यक्त करत एका वकिलाने सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी चालू असताना थेट सरन्यायाधीशांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. तो वकील बूट काढून सरन्यायाधीशांच्या दिशेने भिरकावणार इतक्यात सुरक्षारक्षकांनी त्याला पकडले आणि न्यायालयाबाहेर नेले.

# नगरपरिषदेचे आरक्षण जाहीर; महिलांना संधी

## अलिबाग नगरपरिषद खुला महिला प्रवर्गासाठी राखीव

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

सर्वोच्च न्यायालयाने जानेवारी महिना संपण्यापूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे या निवडणुकीच्या प्रक्रियेला वेग आला आहे. प्रशासनाने वेगाने तयारीदेखील सुरु केली आहे. रायगड जिल्ह्यातील नगरपरिषदांवर गेल्या तीन वर्षांपासून प्रशासकीय राजवट सुरु आहे. लवकरच प्रशासकीय राज संपण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातील नऊ नगरपरिषदांसह राज्यातील नगरपरिषद अध्यक्षपदाची सोडत सोमवारी (दि.६) मंत्रालयात मंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आली.




त्यात खुला महिला प्रवर्ग, ओबीसी महिला आणि ओबीसी राखीव असे आरक्षण ठेवण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सहा नगरपरिषदांवर महिला तर तीन नगरपरिषदांवर पुरुषांचे राज असणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरक्षण सोडतीत राज्यातील ६७ नगरपरिषदा ओबीसीसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. यापैकी ३४ नगरपरिषदा महिलांसाठी आहेत. तसेच, २३ नगरपरिषदा अनुसुचित जाती जमातींसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. रायगड जिल्ह्यातील अलिबाग नगरपरिषदांसह इतर नऊ नगरपरिषदांचा कार्यकाल संपल्यानंतर निवडणुका घेणे गरजेचे होते. परंतु, शासनाने या निवडणुका पुढे ढकल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील नगरपरिषदांवर मुख्याधिकारीमार्फत प्रशासकीय राजवट सुरू झाली. प्रशासन अधिकाऱ्यांमार्फत जिल्ह्यातील नगरपरिषदांचा कारभार पाहण्यात आला. उच्च शिक्षित अधिकारी प्रशासन अधिकारी म्हणून कामकाज पहात असतानादेखील जिल्ह्यातील अनेक नगरपरिषदांच्या समस्या सोडविण्यास प्रशासक उदासीन ठरल्याचे चित्र आजही आहे. शहरांमधील रस्ते, पाणी तसेच इतर सुविधा उपलब्ध करण्यास प्रशासन अपयशी ठरल्याच्या तक्रारी आजही आहेत. काही नगरपरिषदांमध्ये विकासाच्या नावाखाली भ्रष्टाचार झाल्याचा आरोपही करण्यात आला आहे. अलिबाग नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी सांळुखे यांची बदली झाल्यावर पुर्ण वेळ प्रशासन अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली नाही. त्यामुळे मुरूडच्या मुख्याधिकारी बच्छाव यांच्याकडे अलिबागचा अतिरिक्त कारभार सोपविण्यात आला होता. शहरात रस्ते, पाणी अशा अनेक समस्या निर्माण पान २ वर

# बिहार विधानसभेचे बिगूल वाजले

**| पटना | प्रतिनिधी |**

बिहारमध्ये राबवलेल्या मतदारयाद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणी उपक्रमानंतर राज्यातील अंतिम मतदार यादी मंगळवारी (दि.७) प्रसिद्ध होणार आहे. दरम्यान, आता राज्याची विधानसभा निवडणूक जाहीर झाली आहे. सध्याच्या विधानसभेची मुदत येत्या २२ नोव्हेंबरला संपत आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाला २२ नोव्हेंबरपूर्वी निवडणूक घ्यायची आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने येत्या नोव्हेंबर महिन्यात बिहारची विधानसभा निवडणूक घेण्याचे ठरवले आहे. निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी जाहीर केले की, यावेळी बिहारची निवडणूक दोन टप्प्यांमध्ये पार पडेल. ६ नोव्हेंबर व ११ नोव्हेंबर रोजी पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया राबवली जाईल. तर, १४ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होईल. पान २ वर



### नेरळमध्ये बैल चोरी उघड

**| नेरळ | प्रतिनिधी |**

नेरळमधील चिंचवाडी येथील विठ्ठल पारधी यांच्या गोठ्यातनू २३ सप्टेंबर रोजी मध्यरात्री दोल बैलांची चोरी झाली होती. नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नायक कोंडार यांनी डी.बी. पथकाच्या मदतीने हा गुन्हा उघडकीस आणला आहे. गुन्ह्यातील आरोपी इमरान अहमद शेख (२६), इम्तीयाज इलियाज शेख (३२) या दोघांना शुक्रवारी (दि.३) ताब्यात घेतले आहे. तसेच, चोरी करताना वापरलेली गाडी आणि जनावरांची वक्री करून मिळवलेली ३० हजार रुपये रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे.

### रेशनिंग धारकाला रंगेहात पकडले

**कोलाड** : कोलाड पोलीस ठाण्याचे पोलीस खरबाचीवाडी येथे गस्त घालत असताना गारभट बाजूकडून एक पिकअप गाडी प्लास्टिकच्या कपड्याने पॅक करून येताना दिसली. त्या गाडीला थांबवून तपासणी केली असता त्या गाडीत रेशनिंग दुकानातील गहू व तांदळाच्या ४१ गोणी दिसून आल्या. या गोणी गारभट येथील रेशनिंग दुकानदार शरद उर्फ नाना शिंदे यांच्याकडून भरून पाली-सुधागड येथील ललित ओसवाल यांच्याकडे नेत असल्याचे वाहन चालक दिपक दंत यांनी सांगितले. या पिकअपमधून महाराष्ट्र शासनाचा लोगो असलेला ४१ हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे.

# जेएनपीए बंदरात २३ कोटींचा ई-कचरा जप्त

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

बेकायदेशीरपणे विदेशातून चार कंटेनरमधुन अल्युमिनियमच्या नावाखाली आयात करण्यात आलेला २३ कोटी किमतीचा ई-कचऱ्याचा साठा महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) शनिवारी (दि.४) जप्त केला आहे. याप्रकरणी सुत्रधार असलेल्या सुरतमधील एका कंपनीच्या संचालकाला अटक करण्यात आली आहे.

सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरणाला हानिकारक ठरणाऱ्या आणि प्रतिबंध असतानाही जेएनपीए बंदरात अल्युमिनियमच्या नावाखाली चार कंटेनरमधुन हा ई-कचरा आयात करण्यात



- **लॅपटॉपसह इतर इलेक्ट्रॉनिक सामानांचा समावेश**
- **डीआरआयची कारवाई**

आला होता. याची माहिती मिळाल्यानंतर मुंबई पान २ वर

# शिंदे गटातील सरपंचासह सदस्यांचा प्रताप उघड

**| रेवदंडा| प्रतिनिधी |**

मालमत्ता मुल्यांकन क्रमांक चुकीचा देऊन आपल्या जागेवर अतिक्रमण करण्याबरोबरच भ्रष्टाचार केल्याचा आरोप मुंबईतील रहिवासी संकेत पाटील यांनी रेवदंडा ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक तसेच अन्य सदस्यांवर केला आहे. याबाबतची माहिती संकेत पाटील यांनी सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांना दिली. या प्रकरणात त्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रारही केली आहे. यामध्ये सरपंच, उपसरपंच, सदस्य आणि ग्रामसेवक यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची विनंती अर्जात केली आहे. रेवदंडा ग्रामपंचायतीवर शिंदे गटातील सरपंच आहे.

- **रेवदंड्यातील ग्रामसेवकांचाही समावेश असल्याचा आरोप**
- **अर्जदाराकडून प्रशासनाकडे १२७ वेळा अर्ज**

सरपंचसह काही सदस्यांचा हा प्रताप संकेत पाटील यांनी उघड केला असून यामध्ये ग्रामसेवकांचादेखील हात असल्याची माहिती समोर येत आहे. आतापर्यंत अर्जदाराने ग्रामपंचायतीकडे ४७ वेळा, जिल्हाधिकाऱ्यांकडे १५, जि.प. उपमुख्य कार्यकारी अधिकारी ३५, पंचायत समितीकडे ३५ आणि तहसीलदारांकडे १५ असे एकूण १२७ वेळा अर्ज करूनही प्रशासनाकडून दखल घेण्यात आली नसल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. त्यामुळे प्रशासन शिंदे गटासोबत अर्थपूर्ण संबंध जोपासत आहे कि, त्यांच्या दबावाखाली आहे, याबाबत सर्वत्र चर्चा सुरु असून संबंधितांविरोधात कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पान २ वर

# अनधिकृत वाहनतळांवर सिडकोची कारवाई

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते बुधवारी (दि.८)नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर सिडकोने अतिक्रमणविरोधी म ोहिमेचा जोर वाढविला आहे.

सर्वोच्च न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचा हवाला देत शुक्रवारी (दि.३) पनवेल परिसरातील दोन बेकायदा पार्किंग झोनवर धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत तब्बल १७,२०० चौ.मी. क्षेत्र अतिक्रमणमुक्त करण्यात आले. विशेष म्हणजे विमानतळ परिसरातील पायाभूत पान २ वर

### अवैध वाहनतळाचे भूखंड मोकळे

- पनवेल सेक्टर १८ मधील सुमारे ४,७०० चौ.मी. आणि सेक्टर ३ मध्ये १२,२०० चौ.मी. क्षेत्रफळ व्यापून बसलेल्या अवैध वाहनतळावर बुलडोझर फिरवण्यात आला. शहरातील वाढते अतिक्रमण व अनधिकृत वाहनतळ ही मोठी समस्या बनली आहे. विमानतळासारख्या आंतरराष्ट्रीय प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर वाहतूक आणि सुरक्षेच्या दृष्टीने अशा वाहनतळांमुळे अडचणी निर्माण होऊ नयेत म्हणून ही कारवाई सिडकोकडून करण्यात आली.

## दिबांच्या जयंतीला विमानाचे उड्डाण करावे | विजय शिरढोणकर यांची मागणी

# विमानतळाच्या उद्घाटनाची प्रशासनाला घाई

**| पनवेल | प्रतिनिधी |**

**नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टर्मिनलचे उद्घाटन बुधवारी (दि.८) देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते पार पडणार आहे. मात्र, विमानतळाच्या कामांमध्ये अद्यापही परिपूर्णता नाही. त्यामुळे विमानतळाचे काम अपूर्ण असतानाही विमानतळाच्या उद्घाटनाची घाई का करण्यात आली, असा सवाल उद्योजक विजय शिरढोणकर यांनी केला आहे. तसेच, दिबांच्या शंभराव्या जयंतीला प्रत्यक्ष विमानाचे पहिले उड्डान करावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे.**



यावेळी बोलताना विजय शिरढोणकर सांगितले की, आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन करताना आपले इन्फ्रास्ट्रक्चर पूर्ण नाही, याचेही भान अदानी कंपनीने ठेवायला हवे. विमानतळाच्या प्रवेशद्वारावर असलेल्या पोलीस ठाण्याच्या इम ारतीला बाहेरून चुना फासण्याचे काम ही कंपनी करत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डोळ्यात धूळ फेकत आहे.

विमानतळ उद्घाटन इतक्या घाईघाईने सुरु आहे, परंतु विमानतळासाठी कोणत्याही सुविधा अद्याप पुर्णत्वास आलेल्या नाहीत. ज्या पद्धतीने मेट्रो सेवा, कोस्टल रोड आदी सुविधांची गरज या विमानतळाला आहे, त्या पूर्ण करण्यामध्ये प्रशासन मागे पडले आहे. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय विमानाचे उड्डाण हे डिसेंबरमध्ये सुरु होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे याठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाचे येणारे नागरिक उलव्याच्या ढाब्यावर जेवायला जाणार का? असा सवाल देखील विजय शिरढोणकर यांनी केला आहे. तसेच, उद्घाटनाच्या दिवशी या आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्व. लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर करावे आणि प्रत्यक्ष विम ानाचे उड्डाण हे दिबांच्या १०० व्या जयंतीनिमित्त म्हणजे १३ जानेवारी रोजी करून त्यांच्या स्मृतीला देशाच्यावतीने अभिवादन करण्याची मागणी देखील त्यांनी बोलताना केली आहे.

# आंबेजोगाई-कळंब महामार्गावर शेकापचा रास्तारोको



**| केज | प्रतिनिधी |**

आंबेजोगाई-कळंब या महामार्गावर वेगवेगळ्या मागण्यांसाठी शेतकरी कामगार पक्षातर्फे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनात ओला दुष्काळ जाहीर करून ५० हेक्टरी मदत द्या, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करा, ऊस उत्पादक शेतकऱ्यांची १५ रुपये कपात थांबवा, लाडकी बहीण योजनेसारख्या बळच लादलेल्या योजना बंद करा, पिक विमा सरसकट द्या, शक्तीपीठ महामार्ग रद्द करा, इत्यादी मागण्यांसाठी शेतकरी कामगार शेकापतर्फे रास्ता रोको करण्यात आला होता. सरकारने भांडवलदाराची दलाली थांबवावी अन्यथा तिव्र आंदोलन करू, असा इशारा शेतकरी नेते मोहन गुंड यांनी दिला आहे. यावेळी उमाकांत भुसारी, रुपेश बोरगावकर, मंगेश देशमुख, महेश गायकवाड, जयराज निशिगंध, सचिन उजगरे, रचलिंग पाटील, प्रभुलिंग निगडीकर, ओम कार लामतुरे, राहुल इंगळे, गणेश खानवरे, मयूर सुरवसे, दीपक नांदे, दादा निकम, उत्तरेश्वर खरबड, जयराज मुकदम, विकास जाधव व विजय शिंदे यांसह मोठ्या संख्येने शेकाप कार्यकर्ते उपस्थित होते.

# रा.स. पाटील यांचे निधन

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, माजी प्रार्थमिक जिक्षक रा.स. पाटील (८३) यांचे रविवारी (दि.५) निधन झाले. उरणमधील सर्व ज्ञात असलेले रा.स गुरुजी हे उत्कृष्ट निवेदक, कबड्डी समालोचक, बुद्धिबळ पट्टू, नाट्य दिगदर्शक व १९८४ साली उरण शेतकरी आंदोलनात भाग घेतलेले बहुआयामी व्यक्तीमत्व होते. तसेच, शेकापचे निष्ठावांत कार्यकर्ते म्हणून सुपरिचीत होते. त्यांच्या निधनाची बातमी समजताच उरण मधील सर्व क्षेत्रातील कार्यकत्यांनी शोक व्यक्त केला आहे. ते रायगड जिल्हा पेण प्राथमिक शिक्षक पतपेढीचे सलग दोन वेळा अध्यक्षपद भुषविले होते. तसेच, उरण सेवा निवृत्त ज्येष्ठ नागरिक संस्था, श्री गजानन प्रासादिक भजन मंडळ बोकडवीरा, गणेश क्लब बोकडवीरा, गणेश नाट्य मंडळ गणेशपूर, गणेश लेझीम पथक बोकडवीरा या नामवंत संस्थांमध्ये त्यांनी निष्ठेने काम केले आहे. त्यांच्या अंतयात्रेवेळी कामगार नेते कॉ. भूषण पाटभ्ल, सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार, ज्येष्ठ नागरिक संघटना अध्यक्ष डी.आर. ठाकूर, माजी सरपंच, रमाकांत म्हात्रे, जि.प. सदस्य जीवन गावंड, दिनेश घरत, शरद पाटील, प्रफुल्ल पाटील, सुर्यकांत पाटील, श्रीकांत पाटील, मनोज पाटील व यशवंत ठाकूर यांनी श्रद्धांजली वाहिली.



पान १ वरून

## आज पेझारीत धडकणार लाल वादळ

कालावधीत शंभरहून अधिक अपघात झाले आहेत. त्यामध्ये ३६३ जणांना अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. त्यातील काहींचा मृत्यू देखील झाला आहे. तसेच, जखमी झालेल्यांना कायमचे अपंगत्व आले आहे. हे अपघात रोखण्यासाठी शेकापने रास्ता रोको आंदोलन करण्याची भुमिका घेतली असून गेल्या दोन दिवसांपासून कार्यकर्त्यांच्या बैठका घेण्यात आल्या आहेत. खड्डे बुजविण्याबरोबरच कामाचा योग्य दर्जा याची लेखी हमी देणे, या मागणीसाठी आंदोलन केले जाणार असल्याची माहिती शेकापतर्फे देण्यात आली आहे.

## बिहार विधानसभेचे बिगूल वाजले

१६ नोव्हेंबरआधी निवडणुकीची सगळी प्रक्रिया पूर्ण केली जाईल. पहिल्या टप्प्यातील निवडणुकीसाठी १० ते १७ ऑक्टोबरदरम्यान, तर दुसऱ्या टप्प्यातील निवडणुकीसाठी १३ ते २० ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. १८ ऑक्टोबरपर्यंत पहिल्या टप्प्यातील, तर २१ ऑक्टोबरपर्यंत दुसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्जांची पडताळणी पार पडेल. पहिल्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी २० ऑक्टोबर तर, दुसऱ्या टप्प्यातील अर्ज मागे घेण्यासाठी २३ ऑक्टोबर ही अंतिम तारीख असेल.

## शिंदे गटातील सरपंचासह सदस्यांचा प्रताप उघड

जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, गट विकास अधिकारी, आणि तहसिलदार आदी कार्यालयांमध्ये २४ मे ते २९ सप्टेंबर या कालावधीत अनेक वेळा अर्ज केले आहेत.

ग्रामसेवक प्रसाद गोंधळी (अतिरीक्त पदभार) आणि तत्कालिन ग्रामसेवक नितेश तेलगे यांच्या बद्दल पाटील यांचा आरोप असा आहे की, तत्कालिन ग्रामसेवक नितेश तेलगे यांनी चुकीचा असेसमेंट दिल्यामुळे त्यांची विभागीय चौकशी सुरू करावी. विद्यमान ग्रामसेवक प्रसाद गोंधळी यांनी आशा दामोदर पाटील यांच्या असेसमेंट क्रमांक २२४७ संबंधित मूळ कागदपत्रे गहाळ केल्याचा आरोप आहे. ग्रामसेवक गोंधळी यांनी दहशतीचे वातावरण निर्माण केले आहे. त्यामुळे विस्तार अधिकारी देखील या प्रकरणाबाबत मूग गिळून गप्प असल्याचाही आरोप आहे.

सरपंच आणि उपसरपंच व अन्य सदस्य ग्रामपंचायतीमध्ये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमांतर्गत कामकाज करण्याऐवजी फक्त चहापान करण्यासाठी येत असल्याचा आणि त्यांना कामकाजाचे कोणतेही ज्ञान नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. आशा दामोदर पाटील यांच्यासोबत सरपंच, उपसरपंच व अन्य सदस्यांची आर्थिक देवाण घेवाण झाल्याची दाट शक्यता आहे. केलेल्या कारवाई तक्रारी न करता भ्रष्ट केलेल्या कामावर पडदा टाकण्याचे काम करीत असल्याचा संशय संकेत पाटील यांनी केला आहे. शिंदे गटातील सरपंचांसह अन्य सदस्य, ग्रामपंचायत विभागातील कर्मचारी यांच्यामध्ये आर्थिक देवाण घेवाण झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या भ्रष्ट कारभाराबाबत दोषींवर फौजदारी कारवाईची मागणी केली आहे.

## अनधिकृत वाहनतळांवर सिडकोची कारवाई

सुविधा, सुरक्षेची काळजी तसेच शिस्तबद्ध पार्किंगसाठी मोहीम राबविण्यात आल्याचे सिडकोने स्पष्ट केले आहे. याअंतर्गत कळंबोली जंक्शन परिसरातील रस्त्यालगतची तात्पुरती वाहनतळे व अव्यवस्थित पार्किंग झोन हटवण्यात आले. सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मैंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच अनधिकृत बांधकाम विभागाचे नियंत्रक लक्ष्मीकांत डावरे यांच्या नेतृत्वाखाली मोहीम राबवली.

## खड्ड्यांसाठी शेकाप रस्त्यावर

केलेला सर्व खर्च पाण्यात गेला आहे. या वर्षी शासनाकडून निधी प्राप्त न झाल्याने जिल्हा परिषद सेस फंडातून प्रत्येक तालुक्यासाठी ५ लाख प्रमाणे ७५ लाख रुपये जिल्हा परिषद बांधकाम विभागाला देण्यात आले. परंतु, ग्रामीण भागातील कोणत्या रस्त्याची दुरुस्ती केली, असा सवाल उपस्थित केला जात आहे. कारण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येणारा अलिबाग-रोहा, अलिबाग-मुरूड व अलिबाग-रेवस या रस्त्यांची अवस्था देखील दयनीय आहे. त्यामुळे दुरुस्तीच्या नावाखाली लाखो करोडोचा भ्रष्टाचार होत असल्याचे बोलले जात आहे.

विकासाच्या नावाखाली खोदून ठेवलेले रस्तेच गायब झाले आहेत. गणेशोत्सवासह नवरात्रौत्सवही खड्ड्यातून गेला. मात्र, याकडे विद्यमान आमदारांनी जाणीव पुर्वक दुर्लक्ष केले आहे. सर्वसामान्यांचे प्रचंड हाल होत आहेत. रस्ते चांगले करतील या विश्वासाने आमदारांना निवडून दिले. परंतु, त्यांनी नागरिकांची मोठी घोर निराशा केली आहे. टक्केवारी घेण्यात आमदार मशगूल आहेत. मात्र, विकास फक्त कागदावरच, अशी परिस्थिती आहे. खड्डे चुकविताना अनेक अपघात झाले. या अपघातामध्ये अनेकांना जीव गमवावे लागले आहेत. प्रशासनासह शासनाला याबाबत काहीही देणे घेणे नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे ही मनमानी शेकाप कदापी सहन करणार नाही. सर्वसामान्यांच्या न्याय हक्कासाठी शेतकरी कामगार पक्ष कायमच पुढे आला आहे. आता सर्वसामान्यांना चांगले रस्ते मिळावे, खड्डेमय रस्त्यांविरोधात शेकाप मार्फत एल्गार पुकारला जाणार आहे. रस्त्यावर उतरून, चक्का जाम करून प्रशासनासह शासनाचे लक्ष वेधण्याचे काम केले जाणार असल्याची माहिती प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी दिली आहे.

## नगरपरिषदेचे आरक्षण जाहीर; महिलांना संधी

झाल्या होत्या. मुख्याधिकारी यांच्याकडे तक्रार करूनही त्यांची कार्यवाही झाली नाही. त्यामुळे प्रशासकीय कारभाराबाबत अनेकांनी नाराजी व्यक्त केली. शेकापचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, ॲड. मानसी म्हात्रे यांच्यासह अनेकांनी मुख्याधिकारी यांची भेट घेऊन शहरातील स्वच्छता आणि पाणी प्रश्न तात्काळ सोडवा, अशी मागणी केली होती. अखेर त्यांच्या मागणीची दखल प्रशासनला घ्यावी लागली. त्यामुळे नगरपरिषदांच्या निवडणुका कधी लागणार, याकडे नागरिकांचे डोळे लागून राहिले होते. अखेर लवकरच नगरपरिषदांच्या निवडणुकांचे बिगूल वाजणार आहे. डिसेंबर अखेर हा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यानुसार प्रशासनाकडून हालचाल सुरु झाल्याचे चित्र दिसून आले आहे.

जिल्ह्यातील ९ नगरपरिषदांच्या अध्यक्षपदाचे आरक्षण सोडत जाहिर झाली असून अलिबाग, पेण, व उरण नगरपरिषदांवर खुला महिला प्रवर्ग, मुरूड, रोहा व कर्जत नगरपरिषदांवर ओबीसी महिला तसेच पोलादपूर, खालापूर व तळा नगरपरिषदांवर ओबीसी आरक्षण राखीव ठेवण्यात आले आहे. त्यामुळे निम्म्याहून अधिक नगरपरिषदांवर महिला राज असणार आहे.

## जेएनपीए बंदरात २३ कोटींचा ई-कचरा जप्त

महसूल गुप्तचर संचालनालयाने संशयित चारही कंटेनर ताब्यात घेऊन तपासणी केली. या तपासणीत 'ॲल्युमिनियम ट्रीट स्क्रॅप'च्या नावाखाली भारतात ई-कचरा बेकायदेशीरपणे आयात केला असल्याची बाब समोर आली. यामध्ये एकूण १७,७६० जुने आणि वापरलेले लॅपटॉप, ११,३४० मिनी/बेअरबोन सीपीयू, ७,१४० प्रोसेसर चिप्स आणि इतर इलेक्ट्रॉनिक घटक जप्त करण्यात आले आहेत. जप्त करण्यात आलेल्या मालाची किंमत २३ कोटीच्या घरात असल्याची माहिती डीआरआय विभागाकडून देण्यात आली आहे. याप्रकरणी सुत्रधार असलेल्या सुरतमधील एका कंपनीच्या संचालकाला अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीच तस्करीचे नियोजन, खरेदी आणि वित्तपुरवठा करण्यात सक्रियपणे सहभागी असल्याचे सांगितले.

सरकारी धोरणानुसार सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरणीय सुरक्षितता धोक्यात येते. अशा प्रतिबंधित वस्तूंची भंगार म्हणून विल्हेवाट लावायची असते. मात्र, अशा बेकायदेशीर मालाची मोठ्या प्रमाणावर तस्करी होत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.

## चुलत काकाकडून पुतणीवर अत्याचार

काहीही माहिती देऊ नको, अशी विनंती पीडितेच्या आईने मुलीकडे केली. मात्र, त्या नंतरही या बाबतची माहिती पीडितेने वडिलांना दिल्याने त्याचा राग येऊन आरोपी काका श्रीकांत सूर्यवंशी याने अल्पवयीन पुतणीस घरात एकट्याने गाठत अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. यावेळी झालेल्या झटापटीत काकाच्या तावडीतून आपली सुटका करून घेतली. मात्र, घडलेल्या प्रकाराची माहिती कोणाला दिल्यास वडिलांना जीवे मारण्याची धमकी काकाने पीडितेला दिली. पोलीसांत तक्रार केल्यास समाजात बदनामी होईल, या भीतीने घाबरलेल्या पीडितेन वडिलांसोबत कायमस्वरूपी गावी जाऊन राहण्याचा निर्णय घेतला.परंतु, पीडितेच्या आईने आरोपी काका सोबत राहण्याचा निर्णय घेतल्याने पीडित मुलीने रबाळे पोलीस ठाण्यात काका विरोधात तक्रार दाखल केली. रबाळे पोलिसांनी आरोपी श्रीकांत सूर्यवंशी याला ताब्यात घेतले आहे.

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक श्री.करीनाथ भगवान धस यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे हेदवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग / सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ९१/५ | एकुण क्षेत्र ०-३२-०० हे आर पॉ | ०-३० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक ०७/१०/२०२५

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत
ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१

---

### जाहीर नोटीस

अर्जदारांचे वकील- अतुल चौगुले
श्रीवर्धन येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो यांचे कोर्टात
दि.चौ.अ. १९/२०२५
नि. ११/ड
ने.ता. १०/११/२०२५

१) श्री. अलनासीर मुजफ्फर आराई
वय ६५ वर्षे, धंदा- नोकरी
२) श्री. खलील अहमद मुजफ्फर आराई
वय ५५ वर्षे, धंदा नोकरी
अर्जदार क्र. १ व २ रा. मु. नया नगर मोहल्ला — अर्जदार
ता. श्रीवर्धन, जि. रायगड
३) श्रीम. मारूफा अल्ताफ आराई
वय ५६ वर्षे, व्यवसाय-गृहिणी
४) श्री. आतीफ अल्ताफ आराई
वय ३३, धंदा-नोकरी
५) श्री. मोहम्मद अल्ताफ आराई
वय- २९, धंदा- नोकरी
६) श्रीम. बहुन्निसा असलमखान
वय- ३७, धंदा-गृहिणी
७) श्रीम. सफा अल्ताफ आराई
वय-३३, धंदा- नोकरी
अर्जदार क्र. ३ ते ७ मुळ रा. नया नगर
ता. श्रीवर्धन जि. रायगड सर्व रा. जॉन्सबर्ग, साऊथ आफ्रिका
८) श्रीम. नुसरत अब्दुल सत्तार काजी
वय-५९, धंदा-गृहिणी
रा. मु. रूम नं. २०३, २ रा मजला,
गार्डन व्ह्यू बिल्डिंग, झेड, बी, इंग्लिश
शाळेसमोर, नवायत नगर, सोपारा, बुराहान चौक,
नालासोपारा पश्चिम, ठाणे ४०१२०३

विरूद्ध

कोणीही नाही. ...सा. वाला

मौजे नया नगर, पो. सर्व जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन जि. रायगड येथील मयत कै. मुजफ्फर हुसेन आराई यांचे दि. ०३/०३/२०२२ रोजी निधन झाले. त्यांच्या मृत्यूपश्चात मयताचे वाली वारस अर्जदार क. १ ते ८ हे आहेत. तरी त्यांच्या निधानानंतर त्याच्या मृत्यूपश्चात अर्जदार यांचे नाव शासकीय, निमशासकीय कार्यालयामध्ये दाखल करणेकरीता अर्जदार क्र. १ ते ८ हे कायदेशीर वारस असल्याबाबतचा सक्षम न्यायालयाचा वारस दाखला आणण्यास सांगितले. अर्जदार यांना वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने वारस दाखला मिळण्याकरीता मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे. सदरचा वारस दाखला अर्जदाराला देण्याबाबत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी हरकत घ्यावची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर में, कोर्ट वरील अर्जदार क्र १ ते ८ हे वारस असल्याबाबत पुरावा घेण्याची कारवाई करतील आणि ते मयत मुजफ्फर हुसेन आराई यांचे वारस असल्याचे शाबीत झाल्यास अर्जदार क्र. १ ते ८ यांना वारस असल्याचे मंजूर करतील. तरी मागाहून येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नसून अर्जदार क्र १ ते ८ यांना वारस दाखला देण्यात येईल

आज दि. ०६/१०/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली

सही /-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्या. क. स्तर,
श्रीवर्धन रायगड

सही/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्या. क. स्तर,
श्रीवर्धन रायगड

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, मौजे. पनवेल, ता. पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णन असणाऱ्या व ७/१२ सदरी नावाची नोंद असलेले शेतकरी यांचा मालकी हक्क व ताबाकब्जा आहे. सदर शेतजमिन आमचे आशिल कायम स्वरुपात विकत घेत आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे. पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड**

| अ क्र | कब्जेदार सदरी मालकाचे नाव | सर्व्हे नं/ गट.नं | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १ | लक्ष्मण नामदेव भगत<br>अनघा अनिल भगत<br>कोमल अनिल भगत<br>दिनेश नामदेव भगत<br>भुमिका अनिल भगत अपाक म्हणुन आई अनघा अनिल भगत | ७८८ | ४ | ०-२६-५५<br>पो.ख.०-०३-२५<br>एकुण ०-२९-८० | ०.६५ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, एम.ओ.यू. साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विशद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तकारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : ०६/१०/२०२५

सही/-
**ॲड. सचिन बी. कोंडीलकर,**
शॉप नं.१४२, म्युनसीपल कॉम्प्लेक्स,
जुना भाजी मार्केट जवळ, पनवेल,
ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६.
मो. ९८३३३०६३६१

---

### ग्रुप ग्रामपंचायत भुवन (नोटीस बोर्डावर प्रसिद्ध)

**ता.माणगांव जि.रायगड** — दि.६/१०/२०२५

ग्रामपंचायत भुवन ता.माणगांव, जि.रायगड सन २०२४/२५ व सन २०२५/२६ अंतर्गत विकास कामे निविदा खालीलप्रमाणे

| अ क्र. | कामाचे नाव | प्रशासकीय मान्यता अंदाजित रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम १% | ग्रा.पं.कडे निविदा सादर करणेचा दिनांक | निविदा उघडण्याची दिनांक | कामाची मुदत | योजनेचा नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत कार्यालय येथे नळ कनेक्शन घेणे | २९०५५ | २०० | २९० | १३/१०/२०२५ सकाळी १० ते संध्याकाळी ५ पर्यंत | १४/१०/२०२५ सकाळी ११.०० वा | ६ महिने | १५ वा वित्त आयोग सन २०२४/२५ |
| २ | भुवन आ.वाडी अंगणवाडी येथे पाण्याची टाकी बांधणे | ४९३९३ | २०० | ४९३ | | | | |
| ३ | घोटवळ येथे धोबी घाट बांधणे | १३९४६४ | २०० | १३९४ | | | | |
| ४ | संतोष साळवी यांच्या घरापासून ते रोशन सावंत यांच्या घरापर्यंत गटार बांधणे. | १३९४६४ | २०० | १३९४ | | | | |
| ५ | विठ्ठलनगर येथे सुरेश भोस्तेकर यांच्या घरापासून ते सीताराम शिर्के यांच्या घरापर्यंत गटारावर स्लॅब टाकणे | ८७१६५ | २०० | ८७१ | | | | |
| ६ | भुवन बौद्धवाडी येथील स्मशानाकडे जाणारी संरक्षण भिंत बांधणे | ५९२७२ | २०० | ५९२ | | | | |
| ७ | विठ्ठलनगर येथील राम कदम यांच्या घरापासून ते जयराम यादव यांच्या घरापर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे | १६७३५७ | २०० | १६७३ | | | | |
| ८ | विठ्ठलनगर प्राथमिक शाळा शौचालय नवीन बांधणे | ११०३४० | २०० | ११०३ | ग्रा.प भुवन | | ६ महिने | १५ वा वित्त आयोग सन २०२५/२६ |
| ९ | अंगणवाडी फर्निचर खरेदी करणे | ४४१३६ | २०० | ४४१ | | | | |
| १० | भुवन आदिवासी वाडी अंतर्गत रस्ता करणे | ७५०३१ | २०० | ७५० | | | | |
| ११ | घोटवळ येथे अंतर्गत रस्ता करणे | २११८५३ | २०० | २११८ | | | | |
| १२ | संतोष साळवी यांच्या घरापासून ते शंकर गजमल यांच्या घरापर्यंत गटार बांधणे | ३६७८०० | २०० | ३६७८ | | | | |
| १३ | TCL खरेदी | ५०००० | २०० | ५०० | | | | |
| १४ | मेडीक्लोर बॉटल वाटप करणे | ५०००० | २०० | ५०० | | | | |
| १५ | शेवाळ पावडर खरेदी | ३०००० | २०० | ३०० | | | | |
| १६ | फोगिंग मशीन खरेदी करणे | ४०००० | २०० | ४०० | | | | |
| १७ | विठ्ठलनगर येथे नवीन पाईपलाईन करणे | १९७८०० | २०० | १९७८ | | | | |
| १८ | विठ्ठलनगर व्यायामशाळेला व्यायाम साहित्य खरेदी करणे | १५०००० | २०० | १५०० | | | ६ महिने | ग्रामनिधी सन २०२५/२६ |
| १९ | भुवन आदिवासीवाडी येथे सभागृह बांधणे | २००००० | २०० | २००० | | | ६ महिने | ग्रामनिधी १५% मागासवर्गीय खर्च सन २०२५/२६ |

**अटी व शर्ती**
१. सदर निविदांबाबत अधिक माहिती ग्रुप ग्रा.पं.भुवन येथे कार्यालयीन वेळेत मिळेल.
२. निविदा मंजूर व नामंजूर करण्याचा अधिकार हा सरपंच तथा ग्रा.पं.भुवन यांना राहील. निविदा नामंजूर झाल्यास कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
३. उपलब्ध निधीनुसार देयके अदा करणेत येईल.
४. निविदा सरपंच तथा ग्रा.पं.भुवन, ता.माणगांव, जि.रायगड या पत्त्यावर पाठविण्यांत याव्यात. निविदा बंद लिफाफ्यात पाठविण्यांत याव्यात.

सही/-
**श्री.राकेश ल.मोरे**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत भुवन**
**ता.माणगांव जि.रायगड**

सही/-
**श्री.दिपक श्रीराम जाधव**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत भुवन**
**ता.माणगांव जि.रायगड**

---

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल, १. समीर नेताजी पालकर आणि २. स्वप्नील नेताजी पालकर, यांनी जमीन मालक १. शरद वासुदेव खानविलकर, २. सुलक्षणा निरंजन विचारे, ३. पार्वती विश्वनाथ विचारे, ४. सायली संजय राजेशिर्के, ५. नितेश जयवंत मोहिते, ६. गीतांजली जयवंत मोहिते, यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील, व मालकीची, आणि भोगवटासदरी नावे असलेली खालील वर्णनाची जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे-कोशाणे, ता.कर्जत, जि.रायगड, येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ४४/३ | ०.४४.४०<br>पो.ख. ०.०६.९०<br>एकूण ०.५१.३० | २.२० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, ०७ (सात) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करुन पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत दि. ०७/१०/२०२५

कळावे
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं. १०.
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता कर्जत, जि. रायगड, पिन-४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

---

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे कुदे, ता.अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक आनंता नथुराम म्हात्रे, बाळीबाई नथुराम म्हात्रे, अनिल नथुराम म्हात्रे रा.मु.धोंडखार तर्फे उमटे, पो.सानेगांव, ता.रोहा, जि.रायगड यांच्या नांवे असलेली सामाईक मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली मिळकत माझे स्नेही यांना कायमस्वरूपात विकत देण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| कुदे ता.अलिबाग जि. रायगड | ३०१ | ०-२०-२०<br>पो.ख ०-०४-८०<br>एकूण क्षेत्र ०-२५-०० | ४.५३ |

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- ०७/१०/२०२५

सही /-
**श्री. किशोर वामन तेलंगे**
पत्ता : श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालयासमोर गाळा क्र.३, ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६

---

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालय, ता.पेण.जि.रायगड**
दुरध्वनी क्रमांक : ०२१४३-२५२०३६, Email id - tahasilpen@gmail.com
महसूल शाखा-क्र.फौजदारी/कात-४/मृत्यु दाखला/दा.क्र.२५६/२०२५ दिनांक:-१५/०९/२०२५

**जाहिरनामा**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

चंद्रकांत हरिभाऊ म्हात्रे, — अर्जदार
रा.पाटणोली, ता.पेण, जि.रायगड
विरुद्ध
ग्रामपंचायत पाटणोली, — सामनेवाला
ता.पेण, जि.रायगड

या जाहीर नोटीशीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांची आजी चिंधूबाई खंडू म्हात्रे हिचा मृत्यु दिनांक १७/११/१९८५ रोजी मौजे पाटणोली, ता.पेण,जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत पाटणोली, ता.पेण,जि.रायगड यांचेकडे झालेली नसल्याने मृत्यु नोंद घालणेसाठी या कार्यालयांत अर्ज दाखल केला आहे. तरी या अर्जाची चौकशी तात्काळ करावयाची असल्याने याकामी जर अर्जदार यांच्या आजीच्या मृत्युची नोंद घालण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पुढील १५ दिवसांत कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालयांत समक्ष हजर राहून आपले म्हणणे मांडावे. कोणाचेही म्हणणे किंवा आक्षेप या कार्यालयांत मुदतीत प्राप्त न झाल्यास अर्जावर उपलब्ध पुरावे, कागदपत्र विचारात घेऊन अर्जदार यांना उशिरा मृत्यु नोंद दाखला देणेबाबत पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १५/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/-
**(तानाजी शेजाळ)**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

---

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालय, ता.पेण.जि.रायगड**
दुरध्वनी क्रमांक : ०२१४३-२५२०३६, Email id - tahasilpen@gmail.com
महसूल शाखा-क्र.फौजदारी/कात-४/मृत्यु दाखला/दा.क्र.२५५/२०२५ दिनांक :-१५/०९/२०२५

**जाहिरनामा**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

चंद्रकांत हरिभाऊ म्हात्रे, — अर्जदार
रा.पाटणोली, ता.पेण, जि.रायगड
विरुद्ध
ग्रामपंचायत पाटणोली, — सामनेवाला
ता.पेण, जि.रायगड

या जाहीर नोटीशीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांची काकी राधाबाई जनार्दन म्हात्रे हिचा मृत्यु दिनांक १०/०१/२०१९ रोजी मौजे पाटणोली, ता.पेण,जि.रायगड येथे झाला असून त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत पाटणोली, ता.पेण,जि.रायगड यांचेकडे झालेली नसल्याने मृत्यु नोंद घालणेसाठी या कार्यालयांत अर्ज दाखल केला आहे. तरी या अर्जाची चौकशी तात्काळ करावयाची असल्याने याकामी जर अर्जदार यांच्या काकीच्या मृत्युची नोंद घालण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पुढील १५ दिवसांत कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालयांत समक्ष हजर राहून आपले म्हणणे मांडावे. कोणाचेही म्हणणे किंवा आक्षेप या कार्यालयांत मुदतीत प्राप्त न झाल्यास अर्जावर उपलब्ध पुरावे, कागदपत्र विचारात घेऊन अर्जदार यांना उशिरा मृत्यु नोंद दाखला देणेबाबत पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १५/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/-
**(तानाजी शेजाळ)**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

---

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालय, ता.पेण.जि.रायगड**
दुरध्वनी क्रमांक : ०२१४३-२५२०३६, Email id - tahasilpen@gmail.com
महसूल शाखा-क्र.फौजदारी/कात-४/मृत्यु दाखला/दा.क्र.२५४/२०२५ दिनांक :- १५/०९/२०२५

**जाहिरनामा**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

चंद्रकांत हरिभाऊ म्हात्रे, — अर्जदार
रा.पाटणोली, ता.पेण, जि.रायगड
विरुद्ध
ग्रामपंचायत पाटणोली, — सामनेवाला
ता.पेण, जि.रायगड

या जाहीर नोटीशीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई यमुनाबाई हरिभाऊ म्हात्रे हिचा मृत्यु दिनांक १४/१०/२०१३ रोजी मौजे पाटणोली, ता.पेण,जि.रायगड येथे झाला असून त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत पाटणोली, ता.पेण,जि.रायगड यांचेकडे झालेली नसल्याने मृत्यु नोंद घालणेसाठी या कार्यालयांत अर्ज दाखल केला आहे. तरी या अर्जाची चौकशी तात्काळ करावयाची असल्याने याकामी जर अर्जदार यांच्या आईच्या मृत्युची नोंद घालण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पुढील १५ दिवसांत कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालयांत समक्ष हजर राहून आपले म्हणणे मांडावे. कोणाचेही म्हणणे किंवा आक्षेप या कार्यालयांत मुदतीत प्राप्त न झाल्यास अर्जावर उपलब्ध पुरावे, कागदपत्र विचारात घेऊन अर्जदार यांना उशिरा मृत्यु नोंद दाखला देणेबाबत पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १५/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/-
**(तानाजी शेजाळ)**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

# निवडक

## विमानतळ उद्घाटनाआधी कारवाई

**पनवेल :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते ८ ऑक्टोबर रोजी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर सिडकोने अतिक्रमणविरोधी मोहिमेचा जोर वाढविला आहे. सर्वोच्च न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचा हवाला देत शुक्रवारी पनवेल परिसरातील दोन बेकायदा पार्किंग झोनवर धडक कारवाई करण्यात आली. कारवाईत तब्बल १७,२०० चौ.मी. क्षेत्र अतिक्रमणमुक्त करण्यात आले. विशेष म्हणजे विमानतळ परिसरातील पायाभूत सुविधा, सुरक्षेची काळजी तसेच शिस्तबद्ध पार्किंगसाठी मोहीम राबविण्यात आल्याचे सिडकोने स्पष्ट केले आहे. याअंतर्गत कळंबोली जंक्शन परिसरातील रस्त्यालगतची तात्पुरती वाहनतळे व अव्यवस्थित पार्किंग झोन हटवण्यात आले.सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मैंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच अनधिकृत बांधकाम विभागाचे नियंत्रक लक्ष्मीकांत डावरे यांच्या नेतृत्वाखाली मोहीम राबवली.

## बाजारपेठेत आकाशकंदील दाखल

**पनवेल :** सुमारे दशकभरापासून अनेक कुटुंबीय तयार करीत असलेल्या आकाशकंदिलांना पनवेलसह परिसरातील पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करणाऱ्यांकडून मोठी मागणी आहे. सध्या मिनी आकाशकंदील २० रुपयांपासून महा आकाश कंदील जवळपास १००० रुपयांपर्यंत येथे मिळत असतो. हल्ली इको फ्रेंडली वस्तूंची मागणी मोठ्या प्रमाणात वाढू लागली आहे. रंगीबेरंगी कापडी, हॉलोग्राफी, मार्बल पेपर यासह फोल्डिंगचे असंख्य प्रकारचे आकर्षक आकाश कंदील विक्रीसाठी बाजारात दाखल झाले आहे. त्यात पॅराशूट कंदील, आकाशदीप, फायर बॉल, कलश, टोमॅटो बॉल, हॅण्डमेड



कापडी तसेच लहान आकाराचे अशा आकाश कंदिलांना चांगली मागणी असून ५० ते ५०० रुपयांपर्यंत भाव आहे. यंदाच्या वर्षी किंमतीत आठ ते दहा टक्क्यांनी वाढगत वर्षीपेक्षा यंदा आकाशदिव्याच्या किंमती ८ ते १० टक्क्यांनी वाढल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले, ग्राहकांनी मेड इन चायना आणि प्लास्टिकच्या आकाशकंदिलांकडे पाठ फिरवली आहे. त्यामुळे इको फ्रेंडली आकाश कंदील तयार करणाऱ्या विक्रेत्यांकडे दरवर्षी मागणी सातत्याने वाढत आहे. पूर्वीचे कामट्यापासून तयार करण्यात येत असलेले आकाश कंदील आता दिसेनासे झाले आहेत. देशी बनावटीच्या आकाश दिव्याना जास्त पसंती मिळत नसल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

## महेंद्र घरत यांना 'समाजभूषण' पुरस्कार



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

रात्र वैऱ्याची आहे, जागे व्हा! प्रकाश होणारच आहे. प्रत्येक जण सक्षम आहे, पण परिस्थिती गंभीर आहे. घटना तुडविली जातेय. आयुष्यात मानसिकदृष्ट्या सक्षम नसाल तर निर्णय चुकेल. महेंद्र घरत तुम्ही गांधी-आंबेडकर यांचे विचार जगताय. समाजाचे भले करण्यासाठी धडपडताय. त्यामुळे आजच्या गांधीजींच्या नावाने दिल्या जाणाऱ्या समाजभूषण पुरस्कारासाठी तुम्ही योग्य आहात, असे उद्गार राज्याचे माजी पोलिस महासंचालक सुधाकर सुराडकर यांनी काढले. मैत्री संस्था आणि युवा सामाजिक प्रतिष्ठान तर्फे मुंबई येथे रविवारी (ता.५) रोजी पार पडलेल्या मुंबईतील प्रेस क्लबच्या कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांना प्रेस क्लबच्या कार्यक्रमात डॉ. सुधाकर सुराडकर यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी सद्भावना समाजभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले.



## महालक्ष्मी मंदिरात भजनाचा कार्यक्रम

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

प्राचीन काळातील महत्वाचे असलेले बागमळा महालक्ष्मी मंदिरात नवरात्र उत्सव साजरा करण्यात येतो, या निमित्त महालक्ष्मी मंदिरात भजनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. महालक्ष्मी मंदिर बागमळा येथे देवीच्या दर्शन साठी नवरात्र उत्सवात हजारो भाविक दर्शनास येतात देवीचे परमभक्त पोलिस पाटील पाचकळशी समाजाचे माजी अध्यक्ष अनंत घरत उत्सवाच्या दिवसांमध्ये नाच, कार्यक्रम, भजने स्वखर्चाने २५ वर्ष सेवाभावे वृत्तीने करतात. अतिवृष्टी असताना सुधा नागाव डावले येथील भजन होते. त्यावेळी पाचकळशी माळी समाज माजी अध्यक्ष सुरेश घरत यांनी ते २५ वर्ष करत असलेल्या धार्मिक कार्यक्रमाचा निस्वार्थ सेवा केल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.दरवर्षी चौल, रेवदंडा व नागाव येथीललोक या कार्यक्रमाला उपस्थित असतात.

## कर्जतमध्ये पुन्हा महिलाराज

**नेरळ :** राज्यात नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूक घेण्याची जोरदार तयारी राज्य सरकारकडून सुरु आहे. त्यासाठी राज्यातील मुदत संपलेल्या नगरपरिषद यांच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यासाठी थेट नगराध्यक्षपदाच्या आरक्षणाची सोडत काढली. कर्जत नगरपरिषद नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव महिला राखीव असे आरक्षण जाहीर झाले आहे. आज जाहीर करण्यपदाच्या सोडतीत कर्जत नगरीचे नगराध्यक्षपद हे नागरिकांचा मागासप्रवर्ग महिला यांच्यासाठी राखीव झाले आहे. पुन्हा एकदा महिलाराज पुढील पाच महिलाराज कर्जत शहरात असणार आहे.पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने काढण्यात आलेल्या सोडतीनंतर थेट नगराध्यक्ष पद हे नागरिकांचा मागासप्रवर्ग महिला राखीव झाले आहे.

# रक्तपेढ्यांना करणार रक्त पुरवठा

## कमी संकलन रक्तपेढ्यांवर नजर; राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या सूचना

**। रायगड । प्रतिनिधी ।**

स्वातंत्र्यदिन, गणेशोत्सव, नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित सेवा पंधरवडा, अन्य प्रयोजनानिमित्त विविध सामाजिक संस्थांकडून मागील दोन महिन्यांमध्ये राज्यभरात मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे अनेक रक्तपेढ्यांमध्ये अतिरिक्त रक्त संकलन झाले आहे.

हे रक्त वाया जाऊ नये यासाठी अतिरिक्त रक्त संकलन करणाऱ्या रक्तपेढ्यांनी उपेक्षित जिल्ह्यातील रक्त केंद्रांमध्ये चौकशी करून त्यांना रक्त वितरित करावे, अशी सूचना राज्य रक्त संक्रमण परिषदेने केली आहे. त्यामुळे अतिरिक्त रक्त वाया न जाता त्याचा योग्य वापर होणार आहे.



स्वातंत्र्य दिनापासून २ ऑक्टोबरपर्यंत राज्यामध्ये विविध उत्सवांदरम्यान सामाजिक, राजकीय व धार्मिक संघटनांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबिरांचे आयोजन केले होते.

परिणामी ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर या कालावधीमध्ये मोठ्या प्रमाणात रक्त संकलित झाले. अनेकदा राजकीय दबावाखाली आवश्यकता नसतानाही रक्तपेढ्यांना रक्तदान शिबिरांचे आयोजन करावे लागते.

अतिरिक्त रक्त संकलनामुळे रक्त वाया जाण्याचे प्रमाण लक्षात घेता एसबीटीसीने राज्यातील सर्व रक्तपेढ्यांना मागील तीन वर्षांची रक्ताची सरासरी मागणी लक्षात घेऊन रक्त संकलन करण्याच्या, तसेच कोणत्याही परिस्थितीत रक्तपेढीमार्फत अतिरिक्त रक्त संकलन केल्यानंतर ते मुदतबाह्य होऊन वाया जाणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी अशी सूचना करण्यात आली होत्या. तसेच रक्तदान शिबीर संयोजकांचे समुपदेशन करून रक्ताच्या तुटवड्याच्या कालावधीत रक्तदान शिबिरे आयोजित करण्याबाबत विनंती करावी, असेही सूचविण्यात आले आहे. मात्र तरीही काही जिल्ह्यांमधील रक्त केंद्रांमध्ये गरजेपेक्षा जास्त रक्त संकलित झाल्याचे निदर्शनास आले आहे.

हे रक्त वाया जाऊ नये यासाठी एसबीटीसीने कमी रक्त संकलित होणाऱ्या रक्तपेढ्यांना अतिरिक्त रक्ताचे वितरण करण्याचे निर्देश दिले आहेत. कमी रक्त संकलित होत असलेल्या भंडारा, गोंदिया, हिंगोली, नंदुरबार, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, गडचिरोली, वर्धा या जिल्ह्यांमधील रक्तपेढ्यांकडे चौकशी करून अतिरिक्त रक्त वितरित करावे, जेणेकरून अतिरिक्त रक्ताचा योग्य वापर होऊन रक्त वाया जाणार नाही, असे राज्य रक्त संक्रमण परिषदेकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### एसबीटीसीकडून प्रथमच समन्वयकाची नेमणूक

अतिरिक्त रक्त संकलित करणाऱ्या रक्तपेढ्यांतील रक्त कमी रक्तसाठा असलेल्या रक्तपेढ्यांना वितरित करण्याची प्रक्रिया सुलभ व पारदर्शकपणे पार पडावी यासाठी एसबीटीसीने यंदा प्रथमच समन्वयकाची नेमणूक केली आहे. यामुळे रक्ताच्या वाहतुकीमध्ये येणारे अडथळे दूर करून एकाच फेरीमध्ये एका जिल्ह्यातील अतिरिक्त रक्त दुसऱ्या जिल्ह्यात नेणे सहज सोपे होणार आहे. त्याचबरोबर रक्ताची विक्री होण्याच्या प्रकाराला आळा घालणे शक्य होणार आहे.

# आदिवासींची वाट सततच्या पावसाने रोखली

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

ब्रिटिश माथेरानमध्ये ज्या रस्त्याने सर्वप्रथम आले. तो शिवाजी ग्लॅडर रस्ता यावर्षीच्या पावसाने वाहून नेला आहे. माथेरानच्या डोंगरदरीत वसलेल्या खोंडा या आदिवासी गावाकडे माथेरानमधून जाणारी पायवाट ही मुसळधार पडणाऱ्या पावसात झालेल्या भूस्खलनामुळे लुप्त झाली. माथेरानमधून डोंगरदरीतून खाली उतरण्यासाठी असलेल्या लोखंडी शिडीची पूर्णपणे दुरवस्था झाली आहे. यामुळे आता आदिवासी ग्रामस्थांपुढे उपजीविकेचा यक्षप्रश्न निर्माण झाला आहे.




माथेरान डोंगरातील खोंडा गावाकडे जाण्यासाठी माथेरानमधील छत्रपती शिवाजी महाराज लॅडर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या दरीतून शिडी उतरून खाली जाणे व पुढे निसरडी पायवाट असा एकमेव मार्ग आहे. या मार्गावरील आदिवासी लोक आपल्या कुटुंबाच्या उपजीविकेसाठी माथेरानमध्ये डोंगर चढून येतात. यावर्षी सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस झालेल्या मुसळधार पावसात खोंडा गावाकडे जाणारी दरी भागातील पायवाट ही मोठ्या प्रमाणात झालेल्या भूस्खलनामुळे लुप्त झाली आहे. लोखंडी शिडीची संपूर्ण दुरवस्था होऊन रस्ता नष्ट झाला आहे. खोंडावासीयांना गावात जायला दुसरा मार्गच नाही. या जीवघेण्या प्रवासाची प्रशासन दखल घेणार का? असा प्रश्न खोंडा आदिवासी गावातील ग्रामस्थांकडून केली जात आहे.

> **माथेरानमधील पर्यटन व्यवसायावर माथेरान डोंगरातील आदिवासी लोकांचे जीवनमान अवलंबून आहे. अशावेळी या आदिवासी गावांमधील श्रमिकांसाठी शासनाने पाऊलवाटा मजबूत करण्याची गरज आहे.**
> **– जनार्दन पार्टे, स्थानिक सामाजिक कार्यकर्ते**

# सराईत सोनसाखळी चोर पोलिसांकडून गजाआड

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेलसह नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसरात मोठ्या प्रमाणात चैन स्नॅचिंगच्या घटना घडत आहेत. या गुन्ह्यांची उकल करण्याच्या अनुषंगाने पनवेल शहर पोलिसांनी अत्यंत मुळापर्यंत जाऊन तपास केला. सराईत सोनसाखळी चोराला अखेर पोलिसांनी जेरबंद केले.

पनवेल व नवी मुंबई परिसरात गाडीवर येऊन रस्त्यावर चालणाऱ्या पादचाऱ्यांच्या गळ्यामधून सोन्याचे दागिने खेचून घेण्याचे प्रकार घडत आहे. विशेष करून महिलांचे मंगळसूत्र, गंठण, सोन्याची चैन याची स्नॅचिंग होत आहे. चैन स्नॅचिंग करण्याची पद्धत अभ्यासली, त्याचबरोबर अभिलेखा वरील गुन्हेगारांची माहिती घेतली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. त्याचबरोबर गुप्त बातमीदारांचाही आधार घेण्यात आला. त्यानुसार कल्याण आंबिवली येथे इराणी वस्तीमध्ये सराईत सोनसाखळी चोर रहात असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली. त्यानुसार इराणी वस्तीमध्ये सापळा रचला. सलमान साजिद जाफरी (वय २२ वर्ष रा. आंबिवली) याला फिल्मी स्टाईलने पोलिसांनी नियोजनबद्ध पद्धतीने जेरबंद केले. या आरोपीच्या अटकेमुळे पनवेलसह नवी मुंबई परिसरातील चैन स्नॅचिंगचे गुन्हे उघडकीस येणार आहेत.

# अजगरास पकडून दिले जीवदान

**। पनवेल । प्रतिनिधी ।**



नेरुळ, एमआयडीसी, महात्मा गांधी नगर, ब्लॉक कंपनीमध्ये काम करत असलेल्या कामगारांचा पुनर्वसु फाउंडेशनला कॉल आला, त्यांनी फोन वरून माहिती दिली की कंपनी परिसरात एक भला मोठा साप फिरत आहे.

पुनर्वसु फॉउंडेशनचे सर्पमित्र त्वरित घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळी पोहोचल्यावर कचऱ्याचा खूप साऱ्या गोण्या पडलेल्या दिसल्या. जागा अतिशय कमी व अडगळीची होती. सर्वांनी मिळवून अडगळ, कचरा, गोण्या हटवण्यास सुरूवात केली. लोकांनी सापाचे व्हिडीओ दाखवले. त्यावरून तो अजगर जातीचा सर्प असल्याचे लक्षात आले, पण अजगरास शोधता शोधता अचानक एका गोणी हलवताक्षणी त्यातून एक नाग जातीचा सर्प फणा काढून समोर आला. गौरव व शुभम यांनी अत्यंत सुरक्षितरित्या पब्लिक व सहकारी मित्राना मागे सारून नागाला सुरक्षितरित्या पकडले. पुन्हा अजगराचा शोध सुरु करून अजगरालादेखील सुरक्षितरित्या पकडले.

# जंजिरा किल्ल्यावर जेट्टीचे बांधकाम अंतिम टप्प्यात

**। आगरदांडा। । प्रतिनिधी ।**

ऐतिहासिक जंजिरा किल्ला पर्यटकांसाठी मुख्य आकर्षण आहे. हा किल्ला समुद्रात असल्याने या ठिकाणी जाण्यासाठी शिडाच्या बोटीने जावे लागते. परंतु किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर समुद्राच्या लाटांचा मारा कधी जास्त होत असल्याने बोट चालकांना बोट लावतेवेळी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते त्याबरोबर पर्यटकांना ही बोटीतून उतरताना मोठे कठीण जायचे काहीजण पर्यटक उतरताना पडुन जखमी होऊ लागल्याने किल्ल्यावर अद्यावत जेट्टी असावी अशी मागणी सर्वच



स्तरावर होऊ लागल्याने राज्य शासनाने सागरमाला योजनेंतर्गत ९३.५६ कोटी खर्चून अद्यावत जेट्टीला मान्यता सप्टेंबर २०२२ दिली होती.

जंजिरा किल्ल्यांच्या पुढील बाजुस प्रथम २५० मीटर लांबीची बॅकवॉटर वॉल बांधण्याचे काम सुरू झाले आहे. ३००० सिमेंटचे ट्रेंटरा ब्लॉक तयार आहेत. मोठ्या दगडाने किल्ल्याच्या मागील बाजूस समुद्रात भिंत बनवण्यात येईल. त्यावर ट्रेंटरा ब्लॉक लावून वॉल बसविण्याचे कामाला सुरुवात झाली. ते पण धिम्या गतीने होत असल्याने पर्यटक व स्थानिकांनी त्यावेळी नाराजी दर्शवली होती. आता या कामाला सुरुवात होऊन काम अंतिम टप्प्यात आहे. कामाला वेग आल्याने लवकरच जेट्टीचे काम पूर्ण होईल आणि पर्यटकांना किल्ल्यात जाणे सोपे होईल. यामुळे पर्यटकांच्या संख्येत अधिकच वाढ होईल, अशी अपेक्षा स्थानिक व्यवसायिक कर्ते कडुन होत आहे.

मेरीटाईम बोर्डाचे उप अभियंता प्रविण पाटील यांना विचारणा केली असता ते म्हणाले की पावासामुळे काम बंद होता आता पुन्हा कामाला सुरुवात झाली आहे. पुढील महिन्यात काम पूर्ण होईल आणि लवकरच जेट्टी पर्यटकां साठी खुली होईल, अशी प्रतिक्रिया प्रविण पाटील यांनी दिली.

# मुरूड येथे निवडणुकीचे बिगुल वाजले

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड जंजिरा नगराध्यक्षपदासाठी ओबीसी आरक्षण सलग तीन वेळा पडल्याने शहराचा कारभार पुन्हा महिला चालवणार असल्याने अनेकांचे पत्ते कट झाले असून कभी खुशी कभी गम मागील सार्वत्रिक निवडणूक नोव्हेंबर २०१६ वर्षी झाली होती.

ओबीसी आरक्षण रद्द झाल्यामुळे २०२१ वर्षी होणाऱ्या निवडणूका लांबणीवर पडल्यामुळे मुरूड जंजिरा नगरपरिषदेचा कारभार गेली ४ वर्षांपेक्षा जास्त प्रशासकांच्या हाती होता. आता निवडणूकीचे दिशेने वाटचाल सुरू झाली आहे. मुरूड जंजिरा नगरपरिषदेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याकरीता येत्या बुधवारी दुपारी ३ वाजता नगरपरिषद सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. निवडणुकीचे पडघम वाजायला सुरुवात झाली आहे. आता लवकरच राज्यातील नगरपरिषदेची निवडणुकीची तारीख राज्य निवडणूक आयोगाने लवकरच जाहीर होईल त्या आधी पडद्यामागे इच्छुक उमेदवारांनी जोरदार हालचाली सुरू करून गाठीभेटी सुरू केल्या आहेत. नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात राजकीय उलथापालथ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मुरुड जंजिरा नगरपरिषद निवडणुकीसाठी १० प्रभाग असून प्रत्येक प्रभागातून दोन नगरसेवक निवडून द्यायचे आहेत. त्याचबरोबर नगरसेवकांची संख्या १७ वरून २० होणार आहे. नगरसेवकांची संख्या वाढविल्याने राजकीय पक्षांना जास्तीत जास्त कार्यकर्त्यांना उमेदवारी देणे शक्य होणार आहे.राज्यात भाजप शिंदे गट शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांची युती असुन, काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना, काँग्रेस व शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस गट यांची आघाडी आहे. हीच युती किंवा आघाडी मुरुड-जंजिरा नगरपरिषद निवडणुकीसाठी होईल की नाही हे सांगता येत नाही.

## पनवेलमध्ये भव्य प्रदर्शन

**पनवेल :** वैश्य ग्लोबल चॅरिटेबल ट्रस्ट आणि पनवेल तालुका वैश्य समाज यांच्या संयुक्त विद्यमाने वाशी ते पनवेल विभाग आयोजित पनवेलमध्ये ११ आणि १२ ऑक्टोबर रोजी वस्तूंचे भव्य प्रदर्शन आणि विक्री दालनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे भव्य प्रदर्शन पनवेल वैश्य समाज हॉल, मिरची गल्ली येथे भरवले जाणार आहे.

**संपर्क साधणाऱ्या प्रवाशांची गैरसोय | एसटीच्या कारभाराचा फटका प्रवाशांना**

# वाहतूक नियंत्रण कक्षातील फोन बंद

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग एसटी बस स्थानकातील वाहतूक नियंत्रण कक्षातील फोन बंद असल्याच्या तक्रारी आहेत. एसटीच्या वेळेची माहिती घेण्यासाठी संपर्क साधणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. एसटी आगारातील या कारभाराचा फटका प्रवाशांना बसत आहे.

अलिबाग एसटी बस आगार हे जिल्ह्याच्या ठिकाणी आहे. ६०हून अधिक एसटी बसेस असून हजारो प्रवासी एसटीतून प्रवास करतात. प्रवाशांना एसटीच्या वेळेची माहिती मिळावी, यासाठी स्थानकात नियंत्रण कक्ष उभारण्यात आले आहे.



या कक्षामध्ये वाहतूक निरीक्षक दर्जाचे अधिकारी नियंत्रक म्हणून काम पहातात.

परंतू गेल्या दीड महिन्यांपासून एसटी बस स्थानकातील वाहतूक नियंत्रण कक्षातील फोन बंद असल्याच्या तक्रारी येत आहेत. २२२००६ या क्रमांकाशी संपर्क साधला, असता हा फोन कायमच व्यस्त अथवा, बंद असल्याचे सांगितले जात असल्याच्या तक्रारी आहेत. अलिबाग एसटी बस स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. वारंवार संपर्क साधूनही फोन लागत नसल्याने आगारातील कारभाराबाबत नाराजीचे सूर निर्माण झाले आहेत. याबाबत कृषीवलनेदेखील नियंत्रण कक्षात फोन लावून संपर्क साधला, परंतु संपर्क झाले नसल्याचे उघड झाले आहे. अलिबाग एसटी बस स्थानकातील बसेस रस्त्यात बंद पडणे, स्थानकात ठिकठिकाणी पडलेल्या खड्डयांच्या दुरुस्तीचा अभाव, अशा अनेक समस्या स्थानकात आहेत. आता या फोन बंद असल्याच्या समस्येत भर पडली आहे. त्यामुळे आगार व्यवस्थापकांनी याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

स्थानकातील वाहतूक नियंत्रण कक्षातील फोन बंद आहे, की नाही याची खात्री करून घेतो. बंद असल्यास तात्काळ दुरुस्त करण्यास सांगितले जाईल. तसेच तेथील निरीक्षकांकडून फोन उचलण्यास टाळाटाळ होत असल्याचे दिसून आल्यास संबंधितांविरोधात कारवाई केली जाईल.

> **एसटी बसच्या वेळेची माहिती घेण्यासाठी अलिबाग एसटी बस स्थानकातील नियंत्रण कक्षामध्ये संपर्क वेळोवेळी केला जातो. परंतु तो फोनच लागत नाही. त्यामुळे बसच्या वेळेची माहिती मिळण्यात अडथळे निर्माण होत आहेत. एसटी बसस्थानकातील या कारभाराबाबत नाराजी व्यक्त होत आहे.**
> **– रमेश पाटील – प्रवासी**

# ‘कफ सिरप’चा इशारा

मध्य प्रदेशात कोल्ड्रिफ नावाचे कफ सिरप घेतल्याने चौदा मुलांचा मृत्यू झाल्याने औषधांवरील नियंत्रणाचा प्रश्न पुन्हा एकवार समोर आला आहे. या प्रकरणी एका डॉक्टरला अटक झाली असली तरी सिरप जिने तयार केले त्या कंपनीवर काय कारवाई होणार हे अधिक महत्वाचे आहे. छिंदवाडा इथे परासिया इथे हे सिरप घेतल्यानेच मुलांचा मृत्यू झाल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. राजस्थानमधील भरतपूर व सिकर इथेही असे प्रकार झाल्याचे आढळले आहे. हा सर्व प्रदेश मागास व आदिवासीबहुल आहे. अशा पट्ट्यामध्ये स्वस्तातील व भेसळयुक्त औषधे दिली विकली जातात का असा प्रश्न यामुळे निर्माण झाला आहे. या मुलांमध्ये सिरप घेतल्यावर उलट्या, हगवण, पोटदुखी व लघवीच्या तक्रारी आढळून आल्या. आरंभी यंत्रणांनी त्याकडे लक्ष दिले नाही. हा ताप व्हायरल किंवा विषाणूजन्य असावा अशी कारणे देण्यात आली. मात्र लोकांच्या वाढत्या दबावानंतर काही मुलांच्या मृतदेहांची उत्तरीय तपासणी करण्यात आली. त्यात डायइथिलिन ग्लायकोल या घातक रसायनाची मात्रा प्रमाणाहून कितीतरी अधिक आढळली. त्यामुळे मग घाईघाईने कोल्ड्रिफ व नेक्सट्रॉस डीएस या औषधांवर बंदी घालण्यात आली. तमीळनाडूच्या कांचीपुरम इथे श्रेसन फार्मास्युटिकल्स या कंपनीने हे सिरप उत्पादित केले होते. केरळ सरकारने या सिरपची विक्री व वितरण थांबवले आहे. महाराष्ट्रात अन्न व औषध प्रशासनाने स्थानिक यंत्रणांना योग्य ती कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. डॉक्टरांनी अशी औषधे न सुचवणे आणि औषध दुकानदारांनी अशा श्रेणीतल्या औषधांचा साठा न ठेवणे हे ताबडतोबीचे उपाय आहेत. ते संबंधित करतील यात शंका नाही नागरिकांनीही सतर्क राहून आपल्या मुलांना कोणते औषध दिले जात आहे व त्यात कोणते घटक आहेत हे काळजीपूर्वक वाचले पाहिजे. शिवाय मुळात दोन वर्षांपर्यंतच्या मुलांना शक्यतो कफ सिरप देऊ नये अशा केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचना आहेत हेही लक्षात ठेवायला हवे. थोडीशी सर्दी झाली तरी लगेच औषधांचा मारा सुरू करणे हेही टाळायला हवे.

## कठोर कारवाई हवी

कफ सिरपबाबत सरकारने केलेली कारवाई योग्यच आहे. आता तिचा शेवटपर्यंत पूर्ण तपास होऊन दोषींना कठोर शासन व्हावे अशी अपेक्षा आहे. मात्र हे करताना दुसऱ्या टोकाला जाणे टाळायला हवे. सर्वच औषधे, सर्वच कंपन्या व सर्वच डॉक्टर यांना आरोपींच्या पिंजऱ्यात उभे करणे टाळायला हवे. मध्य प्रदेशातील प्रकरणात अटक झालेले प्रवीण सोनी हे सरकारी सेवेतील डॉक्टर आहेत. ते खासगी व्यवसायही करतात. गेल्या अनेक वर्षांपासून हे सिरप तसेच या कंपनीची इतरही औषधे आपण मुलांना देत आलो आहोत असे त्यांचे म्हणणे आहे. यावेळच्या सिरपमध्ये डायइथिलिन ग्लायकॉल तब्बल ४८ टक्के इतक्या भयंकर प्रमाणात आढळले. हे कंपनीच्या उत्पादन प्रकल्पात बेपर्वाईमुळे घडले की नफ्याचे प्रमाण वाढवण्यासाठी मुद्दाम घडवले गेले हे तपासायला हवे. डॉक्टरांचे म्हणणे असे आहे की, औषधे ते तयार करीत नाहीत. ज्या रोगावर जे औषधी घटक आवश्यक असतात त्यांच्या अनुरुप बाजारात उपलब्ध असणारी औषधे ते देतात. तीन वर्षांपूर्वी भारतीय कंपन्यांनी तयार केलेले कफ सिरप घेतल्याने गाम्बिया देशातील अनेक मुलांमध्ये मूत्रपिंड निकामी होण्याच्या घटना घडल्या. त्यानंतर जागतिक आरोग्य संघटनेने तपासणी केली असता इथिलिन व डायइथिलिन ग्लायकॉल हेच विषारी घटक याला कारणीभूत असल्याचे आढळले. याच दरम्यान, उझबेकिस्तान, इंडोनेशिया या देशांमध्येही काही बालमृत्यूंच्या घटना घडल्या. त्यामुळे काही औषधांवर बंदी घालून काही कंपन्यांवर कारवाई करण्यात आली. पण त्या कारवाईचे पुढे काय झाले याचा कोणालाच पत्ता नाही. ती कडकपणे झाली असती तर पुन्हा तशाच स्वरुपाचा प्रकार आपल्या देशात घडला नसता. आता पुन्हा एकवार केंद्र सरकार कारवाई केल्याचे नाटक करील. पण ती कारवाई तडीला जाईल हे माध्यमे तसेच डॉक्टरांच्या संघटनांनी पाहायला हवे. कारण, मध्य प्रदेशातली पहिली कारवाई डॉक्टरवरच झालेली आहे व त्यांनाच रुग्णांच्या नातेवाइकांच्या रागाचा पहिला सामना करावा लागू शकतो.

## वेळीच सावध व्हा

दरम्यान, या घटनेमुळे आपल्या एकूण औषध उद्योगाबाबतच अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. भारतातील औषध उद्योगाची उलाढाल सुमारे चार लाख कोटी रुपयांची आहे. त्यातील सुमारे अडीच लाख कोटी रुपये हे निर्यातीतून येतात. जगातील एकूण औषध निर्यातीपैकी २० टक्के म्हणजे एकपंचमांश भारतातून होते. जेनरिक किंवा स्वस्त औषधांच्या उत्पादनात भारताचा जगात पहिला क्रमांक आहे. शिवाय जगात दिल्या जाणाऱ्या लसींपैकी ६० टक्के लसी भारतात तयार होतात. मात्र बोगस औषधांच्या धंद्यातही दुर्दैवाने भारतच अग्रेसर आहे. जगातील ७५ टक्के अशी बोगस व बेकायदा औषधे भारतात तयार होतात. २०२२ मध्ये जे कफ सिरप घेऊन गाम्बियामध्ये ७० आणि उझबेकिस्तानमध्ये १९ मुले मेली तेही असेच बोगस असावे असा एक अंदाज आहे. यासाठी औषध निर्मिती कारखान्यांची सरकारने अधिक कडक पाहणी करायला हवी. उत्पादन प्रक्रिया अत्यंत काटेकोरपणे नियमांचे पालन करून चालते की नाही हे पाहायला हवे. देशाला लाखो कोटींचे परकीय चलन मिळवून देणाऱ्या या उद्योगाची प्रतिष्ठा जपणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी सरकारी यंत्रणांमधील भ्रष्टाचार शून्य असेल हे पाहायला हवे. औषध उद्योगामध्ये जगभरच नाना प्रकारच्या भानगडी चालतात. प्रचंड फायदे मिळवण्यासाठी कंपन्या सोकावलेल्या असतात. औषधांचे काही घटक रुग्णांना अपायकारक असल्याचे चाचण्यांमध्ये आढळले तरी त्याकडे दुर्लक्ष करून औषधे तयार केली जातात. याबद्दल रोश या कंपनीविरुध्द एडम्स नावाच्या कर्मचाऱ्याने दिलेली लढाई प्रसिध्द आहे. जॉन्सन ही कंपनी तर बेकायदा गोष्टींसाठी कुविख्यात आहे. तिच्या पावडरमध्ये तसेच इतर औषधांमध्ये मुले तसेच मोठी माणसे यांना कर्करोग होईल असे घटक असल्याचे वेळोवेळी आढळले होते. तरीही त्या कंपनीची अमेरिकी सरकारने पाठराखण करण्याचा प्रयत्न केला. आपल्याकडे तर बहुसंख्य यंत्रणा भ्रष्टाचाराने किडलेल्या आहेत. त्यामुळे सरकारला कठोरपणे कारवाई करायला हवी. कफ सिरपसारखी प्रकरणे या धोक्याच्या घंटा आहेत. आपल्या औषध उद्योगाबद्दल जगात प्रतिकूल मत झाले तर हा धंदा बसायला वेळ लागणार नाही. अलिकडेच ट्रम्प यांनी अमेरिकेत आयात होणाऱ्या औषधांवर दणकावून कर लागू केला. आज तो फक्त पेटंटेड औषधांसाठी आहे. उद्या तो सरसकटही लागू होऊ शकतो. चीनदेखील आता औषध निर्मिती क्षेत्रात मुसंडी मारण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे भारताने वेळीच सावध होऊन आपली नियंत्रणे भक्कम करण्याची आवश्यकता आहे.

**विचार**

# ग्लोबल वार्मिंगनंतर हिमयुग

***सध्या जागतिक हवामानबदलाची चर्चा सुरू आहे, मात्र यानंतर हिमयुग अवतरण्याची शक्यता आहे. अलीकडेच कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या संशोधकांनी पृथ्वीच्या नैसर्गिक कार्बनचक्रातील एक मोठी त्रुटी शोधून काढली. ही त्रुटी पृथ्वीच्या तापमानात असामान्य बदल कसे होऊ शकतात आणि दीर्घकालीन जागतिक तापमानवाढीनंतर हिमयुगासारखे अत्यंत थंडीचे युग कसे येऊ शकते, हे स्पष्ट करण्यास मदत करते.***



**मिलिंद बेंडाळे**

पृथ्वीचे तापमान प्रामुख्याने खडकांच्या नैसर्गिक क्षरणामुळे नियंत्रित होते. या प्रक्रियेत पाऊस वातावरणातून कार्बन डायऑक्साइड शोषून घेतो. पावसामुळे तो खडकात मिसळतो. खडक हळूहळू विरघळतात आणि कार्बन आणि कॅल्शियमच्या रुपात समुद्रात पोहोचतात. समुद्रात हे कार्बन साठे एकत्र होऊन शंख, कोरल आणि चुनखडीचे खडक तयार होतात. त्यामुळे समुद्राच्या तळावरील कार्बन दीर्घकाळ स्थिर राहतो. शास्त्रज्ञांनी या कार्बनचक्राचा एक नवीन पैलू शोधला आहे. तो पृथ्वीला अत्यंत थंड वातावरणाकडे ढकलू शकतो. पृथ्वी गरम होताना खडकांची झीज वेगाने होते. त्यामुळे जास्त कार्बन डाय डायऑक्साइड शोषले जाते आणि वातावरणातून ते बाहेर पडते. यामुळे पृथ्वी थंड होते. संशोधकांनी म्हटले आहे, की पृथ्वी गरम होताना खडक कार्बन जलद शोषून घेतात आणि पुन्हा थंड करतात. जुने भूगर्भीय पुरावे दर्शवतात की पृथ्वीचे सुरुवातीचे हिमयुग इतके तीव्र होते, की संपूर्ण ग्रह बर्फाने झाकलेला होते. संशोधकांना आढळून आले आहे की समुद्रातला कार्बनसंचयदेखील या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावतो. वातावरणातील कार्बन डायऑक्साइड वाढत असताना आणि पृथ्वी गरम होत असताना फॉस्फरससारखे अधिक पोषक घटक समुद्रात जातात. हे पोषक घटक प्लँक्टनच्या वाढीस चालना देतात. प्लँक्टन सूर्यप्रकाशाच्या मदतीने कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात. प्लँक्टन मरतात, तेव्हा त्यांचे शरीर कार्बनसह समुद्राच्या तळाशी पडते आणि कार्बन कायमचा साठवला जातो; पण उष्ण, पोषक तत्वांनी समृद्ध महासागरांमध्ये ऑक्सिजनची पातळी कमी होते. ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे समुद्राच्या तळाशी जमा होण्याऐवजी फॉस्फरसचा समुद्रात पुनर्वापर केला जातो. अधिक पोषक तत्वे, अधिक प्लँक्टन, अधिक कार्बन संचय, अधिक थंड होणे ही प्रक्रिया हळूहळू संतुलित होण्याऐवजी पृथ्वीला अत्यंत थंड होण्यास कारणीभूत ठरू शकते.

या प्रक्रियेचे स्पष्टीकरण देताना संशोधक सांगतात की, तुम्ही आपल्या घरात एअर कंडिशनर (एसी) चालू करून तापमान २५ अंश सेल्सिअसवर ठेवू इच्छिता. बाहेरील तापमान वाढल्यास एसी अधिक थंडी निर्माण करतो. काही प्रकरणांमध्ये ही थंडी जास्त असू शकते. त्याचप्रमाणे पृथ्वीचा थर्मोस्टॅट कधी कधी जास्त थंडी निर्माण करतो. संशोधनात असेही आढळून आले आहे की प्राचीन काळात वातावरणातील ऑक्सिजनची पातळी खूपच कमी होती. त्यामुळे हे थर्मोस्टॅट आणखी अनियमित आणि अस्थिर बनले. म्हणूनच मागील हिमयुग इतके तीव्र होते. आज उच्च ऑक्सिजन पातळी बदलाचा परिणाम कमकुवत करेल; परंतु तरीही पुढील हिमयुगाच्या प्रारंभास काही प्रमाणात विलंब होऊ शकतो. याचा अर्थ असा आहे का, की मानववंशीय जागतिक तापमानवाढीनंतर पृथ्वी पुढील हिमयुगात प्रवेश करू शकतात? याबाबत संशोधकांचे म्हणणे हो असे आहे; परंतु ते लवकर होणार नाही. त्यांचे मॉडेल असे सूचित करते, की जास्तीत जास्त थंडी असा परिणाम नक्कीच निर्माण करेल; परंतु सध्याचे हवामानसंकट कमी करण्यासाठी हे पुरेसे नाही. संशोधन पत्रात म्हटले आहे, की पुढील हिमयुग पन्नास हजार वर्षांमध्ये सुरू होईल की दोन लाख वर्षांमध्ये हा खरा प्रश्न आहे. पृथ्वीचे नैसर्गिक थर्मोस्टॅट या आयुष्यात आपल्याला मदत करू शकत नाही.

या संशोधनातून स्पष्ट होते की पृथ्वीवरील नैसर्गिक प्रक्रिया गुंतागुंतीच्या आहेत. जागतिक तापमानवाढीच्या सध्याच्या युगात आपल्या क्रियाकलापांवर आणि कार्बन उत्सर्जनावर नियंत्रण ठेवणे आपल्यासाठी अत्यावश्यक आहे. नैसर्गिक प्रणाली अखेरीस ग्रह थंड करतील; परंतु ही प्रक्रिया खूप मंद आहे आणि त्याचे परिणाम आपल्या आयुष्यात जाणवणार नाहीत. म्हणूनच सतत प्रयत्न आणि जागरूकता ही आजची सर्वात तातडीची गरज आहे. शास्त्रज्ञांचा विश्वास आहे की आपल्याला अजूनही आपल्या उत्सर्जनावर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे. हे खरे आहे की उष्ण झालेली पृथ्वी पुन्हा कधी तरी थंड होईल; परंतु ती इतकी मंद असेल की या पिढीला त्याचा काहीही उपयोग होणार नाही. म्हणून आपल्याला आजच कृती करण्याची गरज आहे, कार्बन उत्सर्जन कमी करणे, पर्यावरणपूरक वातावरण निर्माण करणे आणि शाश्वत ऊर्जास्रोतांकडे वाटचाल करणे. जागतिक तापमानवाढ उलटवल्याने थेट हिमयुग सुरू होण्याची शक्यता नाही. त्याऐवजी, पृथ्वीचे नैसर्गिक चक्र आणि हरितगृह परिणाम पुढील हिमयुग सुरू होण्यास विलंब करू शकतात, जे पुढील दहा हजार ते एक लाख वर्षांमध्ये अपेक्षित आहे. काही सिद्धांत सूचित करतात, की जागतिक तापमानवाढ समुद्राच्या प्रवाहांना, विशेषतः गल्फ स्ट्रीमला विस्कळीत करून हिमयुग सुरू करू शकते. त्यामुळे युरोपमध्ये नाट्यमय थंडी पडते.

कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन ताबडतोब थांबले, तरी सध्याच्या जागतिक तापमानवाढीचे आणि महासागरातील बदलांचे परिणाम पुढील हजार वर्षांमध्ये अपरिवर्तनीय असतील. आपल्या आयुष्यात हिमयुग सुरू होणे अशक्य होईल. १९७० च्या दशकाच्या सुरुवातीला सलग अनेक वर्षी थंडी जास्त होती, तेव्हा काही शास्त्रज्ञांनी तापमानातील घट ही पृथ्वी एका नवीन हिमयुगात प्रवेश करत असल्याचे लक्षण आहे, असा अर्थ लावला; परंतु त्या दशकाच्या अखेरीस भाकिते उलटली आणि तज्ज्ञ वाढत्या तापमानाबद्दल काळजी करू लागले. तेव्हापासून सरकारे आणि पर्यावरणीय गट वातावरणातील हरितगृह वायू आणि जागतिक तापमानवाढ कमी करण्यासाठी सार्वजनिक ऊर्जेच्या वापरात नियम आणि बदल करण्यासाठी दबाव आणत आहेत. आपण आपल्या ऊर्जावापराच्या सवयी बदलण्याचा प्रयत्न करत असताना काही शास्त्रज्ञ प्रश्न विचारत आहेत, की जागतिक तापमानवाढ खरोखरच काही उद्देश पूर्ण करत आहे का? ही वाढती उष्णता आपल्याला दुसऱ्या हिमयुगात प्रवेश करण्यापासून रोखत आहे का आणि आपण ही प्रक्रिया उलट केली, तर पुन्हा एकदा बर्फाने झाकले जाऊ का? अतिथंडी आणि उष्णता पृथ्वीच्या इतिहासात नवी नाही. एक अब्ज वर्षांपासून पृथ्वीने उष्णता आणि थंडीच्या कालावधीत तापमानात आलटून पालटून मंद चढ-उतार अनुभवले आहेत. समुद्राचे प्रवाह, सूर्याभोवती पृथ्वीच्या कक्षेत बदल आणि वातावरणीय रचना यासह अनेक घटक याला जबाबदार आहेत. यापैकी काही कालखंड इतरांपेक्षा जास्त तीव्र होते.

हिमयुग नावाच्या तीव्र शीतलहरीही येऊन गेल्या आहेत. त्या दरम्यान विशाल हिमनद्यांनी पृथ्वीचा बराचसा भाग व्यापला होता. हिमयुगांदरम्यान पृथ्वी सामान्यतः सापेक्ष उष्णतेच्या काळात प्रवेश करते, त्याला आंतरहिमयुग म्हणतात, जे आपण गेल्या बारा हजार वर्षांपूर्वीच्या हिमयुगाच्या समाप्तीपासून अनुभवत आहोत. आता दिसते की आपण तापमानवाढीच्या ट्रेंडमध्ये आहोत. अनेक शास्त्रज्ञांच्या मते तो पृथ्वीच्या वातावरणात उष्णता अडकवणाऱ्या हरितगृह वायूंचा परिणाम आहे. एका विचारसरणीच्या मते तापमानवाढ करणारा ग्रह म्हणजे असा ग्रह, जो हिमयुगात संपण्याची शक्यता कमी असते. पृथ्वी नेहमीच उष्ण आणि थंड चक्रातून जात असते. शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की पुढील दहा हजार ते एक लाख वर्षांमध्ये कधी तरी आपल्याला आणखी एका मोठ्या थंडीचा सामना करावा लागेल. असे झाले तर युरोप आणि उत्तर अमेरिकेसह जगाचा बराचसा भाग बर्फाच्या जाड चादरीने झाकला जाईल. काही संशोधकांच्या मते हरितगृह वायुच्या परिणामामुळे पृथ्वीच्या वातावरणात अडकलेली उष्णता या थंडीची भरपाई करेल. ती पृथ्वीला दुसऱ्या हिमयुगात प्रवेश करण्यापासून रोखेल. हिमयुग टाळणे ही चांगली बातमी वाटत असली तरी संशोधकांच्या इशाऱ्यानुसार जागतिक तापमानवाढ ही सोपी कामगिरी नाही. त्याचे पृथ्वीवर इतर गंभीर आणि अप्रिय परिणाम होऊ शकतात.

**चर्चा आजची**

# जिल्हा परिषदेच्या बंद शाळा ओस

**प्रमोद जाधव**

ग्रामीण भागातील तळागाळातील विद्यार्थी शिकला पाहिजे, यासाठी सरकारने गाव तेथे शाळा सारखे उपक्रम राबविले होते. त्यामुळे प्रत्येक गावांमध्ये शाळा बांधणीचा उपक्रम जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात आला. गावातच शाळा उभ्या राहिल्याने पालक वर्गासह विद्यार्थ्यांमध्ये आनंद झाला. मात्र स्पर्धेच्या युगात जिल्हा परिषद शाळेतील शिक्षणाचा दर्जा घसरू लागल्याने पालकांनी अन्य शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पाठविण्यास सुरुवात केली. त्याचा परिणाम पटसंख्येअभावी जिल्हा परिषदेच्या तीनशे शाळा बंद पडल्या. विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्याने याशाळा बंद केल्या. त्यामुळे या शाळा ओस पडल्या आहेत. त्यांचा काहीच वापर होत नाही. त्यामुळे बंद शाळा दूर्लक्षीत झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. बंद शाळांचा योग्य वापर केल्यास जिल्हा परिषदेच्या उत्पन्नात भर पडण्यास मदत होईल अशी चर्चा सुरु आहे.

रायगड जिल्हा परिषदेची शाळेतून अनेक विद्यार्थी घडून वेगवेगळ्या उच्च पदावर कार्यरत आहेत. जिल्हा परिषद शाळेतील आठवणी आजही अनेक विद्यार्थ्यांच्या हृदयात आहेत. गावे, वाड्यांमध्ये असलेल्या मुला मुलींचे ज्ञान मंदिर म्हणून जिल्हा परिषद शाळेकडे पाहिजे जाते. त्यामुळे जिल्हा परिषदेची शाळा प्रत्येकालाच आवडते. जिल्हा परिषद शाळेमध्ये वेगवेगळे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या बौध्दीक व शारीरिक विकासाला चालना देण्याचा प्रयत्न केला जातो.

परंतू गेल्या काही वर्षापासून जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची गळती वाढत आहे. या शाळेतील विद्यार्थी अन्य शाळेत शिक्षण घेत आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद शाळेतील पटसंख्या कमी होऊ लागली आहे.

जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांची गळती थांबविण्यासाठी शिक्षण विभागामार्फत वेगवेगळे उपक्रम सुरु करण्यात आले. शाळांमध्ये वेगवेगळे अभियान घेण्यात आले. दप्तराविना शाळा, खेळता खेळता शिक्षण सारखे उपक्रम राबवण्याबरोबरच पालक, शाळा व्यवस्थापन समितीच्या मदतीने विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. गावांमध्ये रॅली काढून जिल्हा परिषद शाळेचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. शाळा बाह्य विद्यार्थ्यांना शोधून त्यांना जिल्हा परिषद शाळेत टिकून ठेवण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबविले. तरीदेखील जिल्हा परिषद शाळेतील पटसंख्या कमी होऊ लागली. जिल्हा परिषद शाळेत शिक्षणाचा दर्जा नसल्याचा आरोप करीत अनेक पालकांनी अन्य शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पटसंख्येत दिवसेंदिवस घट झाली. वीस पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याचा शासनाने निर्णय घेतला. जिल्ह्यातील ३०० शाळा बंद करण्याची वेळ जिल्हा परिषद शिक्षण विभागावर आली. गेल्या पाच वर्षापासून या शाळा बंद स्थितीत आहेत. फक्त निवडणूकीच्या कालावधीत मतदान केंद्र म्हणून या शाळेला नवा साज चढविण्याचे काम केले जाते. परंतु इतर वेळेला मात्र शिक्षण विभागाचा साधा कर्मचारीदेखील फिरकत नसल्याचे चित्र आहे. रायगड जिल्हयातील अलिबाग, पेण, पनवेल, उरण, महाड, श्रीवर्धन,

कर्जत या सात विधानसभा मतदारसंघातील निवडणूकीचे मतदान २० नोव्हेंबरला होते. मतदान केंद्र सुसज्ज असणे आवश्यक होते. त्यामुळे बंद पडलेल्या शाळांची दुरुस्ती करून त्यांचा मतदान केंद्र म्हणून वापर करण्यात आला होता. शाळांमधील परिसर स्वच्छ करण्याबरोबरच मतदान केंद्रावर अधिकारी व कर्मचाऱ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी बंद शाळांमध्ये पाणी, वीज, स्वच्छतागृह अशा सुविधा उपलब्ध करण्याचे काम बांधकाम विभागामार्फत करण्यात आले होते. बंद पडलेल्या दुर्लक्षीत शाळा मतदानामुळे पुन्हा बोलक्या झाल्या होत्या.

गरज सरो आणि वैद्य मरो अशी अवस्था बंद पडलेल्या जिल्हा परिषद शाळांची झाली आहे.मतदानाचे काम पुर्ण झाल्यावर या शाळांकडे पाठ करण्यात आली आहे.त्यामुळे या शाळा दुर्लक्षीत झाल्या आहेत. पुन्हा शाळेच्या परिसरात गवत वाढण्यापासून, दारे खिडक्या खराब झाल्या आहेत. भिंतीवरील रंग उडू लागले आहे. त्यामुळे शाळा ओसाड झाल्या आहेत. लाखो रुपयांचा दुरुस्तीवर झालेला खर्च पुन्हा एकदा वाया गेला आहे.

बंद पडलेल्या शाळांचा वापर फक्त निवडणूकीच्या कालावधीत केला जात आहे. इतर वेळेला या शाळा दुर्लक्षीत राहत आहेत. करोडो रुपयांचा खर्च करून जिल्हा परिषदेच्या शाळा बांधण्यात आल्या. या दुर्लक्षीत शाळांचा इतर वेळेला योग्य वापरासाठी वापर केल्यास या शाळांमधील बहर कायम टीकून राहू शकतो.

बंद शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा पुर्वी किलबिलाट होता. त्यामुळे शाळा नेहमीच ताजी टवटवीत वाट होती. परंतु शाळा बंद झाल्याने हा किलबिलाट नाहीसा झाला आहे. बोलकी शाळा आता एकटी बेवारससारखी पडून आहे. वाढलेले गवत, तुटलेला पत्रा, तडे पडलेल्या भिंतीच शाळांमध्ये आहे. या शाळांचा निवडणूकीसाठी फक्त वापर करण्यापेक्षा बचत गट व इतर संस्थांना चालविण्यास दिल्यास या शाळांची इमारत कायमच बोलक्या राहतील. शाळा बांधणीसाठी केलेला खर्चदेखील वाया जाणार नाही, अशी प्रतिक्रीया उमटत आहे.

**लोकसंसद**

## पक्ष्यांच्या स्थलांतरावर मोठे गंडांतर

पक्ष्यांचे स्थलांतर हा खरे तर निसर्गाचा एक अद्भुत चमत्कार मानला जातो, कारण पक्षी अन्नाची उपलब्धता, प्रजनन आणि स्थानिक हवामान बदलामुळे त्यांच्या अस्तित्वासाठी आणि प्रजातीच्या वाढीसाठी हजारो किलोमीटरचे लांबचे अंतर कापून स्थलांतर करतात. मात्र वातावरणीय बदल, जागतिक तापमान वाढीमुळे पक्ष्यांच्या स्थलांतरावर मोठे गंडांतर आले आहे. जगभरातील ७३ सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय वन्यजीव तज्ञांचा समावेश असलेली ‘स्थलांतरित प्रजाती आणि हवामान बदल’ विषयक कार्यशाळा ११ ते १३ फेब्रुवारी २०२५ दरम्यान स्कॉटलंडमधील एडिनबर्ग येथे आयोजित करण्यात आली होती. त्या कार्यशाळेचे निष्कर्ष नुकतेच ३ ऑक्टोबर २०२५ रोजी ‘स्थलांतरित प्रजातींवरील अधिवेशन’ने (सीएमएस) प्रसिद्ध केले. या निष्कर्षांवरून असे स्पष्ट झाले आहे की स्थलांतरित पक्षी अभूतपूर्व धोक्यांना तोंड देत आहेत, ज्यामुळे त्यांचा अधिवास नष्ट होत आहे, त्यांच्या स्थलांतराचे मार्ग बदलले आहेत, परिणामी त्यांच्या अनेक प्रजातींसाठी नामशेष होण्याचा धोका वाढला आहे. या कार्यशाळेत इतर प्राण्यांच्या स्थलांतराचादेखील अभ्यास करण्यात आला. या अहवालातून हेही स्पष्ट झाले की स्थलांतरित पक्ष्यांसह प्राण्यांच्या प्रजाती मानवी जीवन टिकवून ठेवणाऱ्या परिसंस्थांमध्ये महत्त्वाचे दुवे म्हणून काम करतात. त्यामुळे प्रजातींच्या स्थलांतरातील अडथळे दूर करण्यासाठी या अनुषंगाने या अहवालात उचित उपाययोजना करण्याचे सुचविण्यात आले आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## शेतकऱ्यांना मोठे पॅकेज जाहीर करणे गरजेचे...

देशातील विविध भागात यंदा पावसाने काही ठिकाणी मुसळधार तर कुठे ढगफुटीसारखा पाऊस बरसून शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. महाराष्ट्रात अतिवृष्टीने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे त्यामुळे शेतकऱ्यांवर संकट उभे येवून ठाकले आहे. ६० लाख हेक्टरपेक्षा जास्त शेतीचे नुकसान झाल्याचे वृत्त आहे. हातातोंडाशी आलेल्या पिकांचा पूर्णपणे चक्काचूर उडाला आहे. या आर्थिक संकटातून शेतकऱ्यांना सावरण्यासाठी महाराष्ट्र सरकारने शेतकऱ्यांच्या मागे खंबीर उभे राहुन मोठी आर्थिक मदत करणे गरजेचे बनले आहे. देशाच्या मध्यवर्ती सरकारने तातडीची मदत म्हणून महाराष्ट्राला २२०० कोटी रुपये दिले आहेत. नुकताच केंद्रीय गृहमंत्री शिर्डी येथे एका कार्यक्रमादरम्यान आले असता राज्य सरकारने केंद्र सरकारला पंचनाम्याचा सविस्तर अहवाल पाठवावा. लगेचच प्रधानमंत्री मदत देतील असे आश्वासन दिले आहे. दरम्यान सिएम यांनी कर वसुलीचा धागा पकडून मापात पाप करणाऱ्या कारखानदारांना सोडणार नसल्याचा इशारा दिला आहे. काही कारखानदारांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीला कडाडून विरोध दर्शविला आहे. त्या अनुषंगाने त्यांनी हे वक्तव्य केले असून यंदाचा गळीत हंगाम १ नोव्हेंबरपासून सुरु करण्याचा तसेच मंत्री समितीच्या बैठकीत मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी १० रुपये आणि पूरग्रस्तांच्या मदतीसाठी प्रतिटन ५ रुपये कपात करण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला आहे त्याला माजी कृषीमंत्री शरद पवार यांनी तीव्र आक्षेप घेतला असून मोठ्या प्रमाणात शेतकरी संघटनांनी, काही कारखानदारांनी आणि शेतकऱ्यांनी जोरदार विरोध दर्शविला आहे आणि ते योग्यचं म्हणावे लागेल. कारण शेतकरी स्वतः मदतीच्या प्रतिक्षेत असताना त्यांच्याकडून अशा पद्धतीने सक्तीने वसूल करणे अत्यंत चुकीचे आहे. त्यासाठी महाराष्ट्र सरकारने या निर्णयाचा फेरविचार करावा तसेच भारत सरकारने यंदा महाराष्ट्रसह देशातील शेतकऱ्यांना या अस्मानी संकटातून सावरण्यासाठी मोठे पॅकेज जाहीर करावे तर आणि तरचं थोडाफार शेतकरी यातून बाहेर पडेल!

**– राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

**दिनविशेष**

# आधुनिक मराठी काव्याचे प्रवर्तक केशवसूत

केशवसुत हे आधुनिक मराठी काव्याचे प्रवर्तक म्हणून ओळखले जाणारे एक श्रेष्ठ कवी. त्यांचे पूर्ण नाव कृष्णाजी केशव दामले. काव्यरत्नावली या मासिकाचे संपादक नारायण नरसिंह फडणीस यांच्या सूचनेवरून ‘केशवसुत’ या टोपणनावाचा त्यांनी स्वीकार केला. त्यांचा जन्म ७ ऑक्टोबर १८६६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील मालगुंड या गावी झाला. त्यांचे शिक्षण खेड, बडोदे, वर्धा, नागपूर व पुणे या ठिकाणी झाले. शिक्षणकालातच १८८० मध्ये त्यांचा विवाह झाला. मॅट्रिकनंतर (१८८९) मुंबईला १८९७ पर्यंत निरनिराळ्या हंगामी नोकऱ्या केल्या. पुढे प्लेगमुळे मुंबई सोडून ते खानदेशात गेले.

केशवसुतांनी विद्यार्थीदशेतच काव्यलेखनास आरंभ केला असला, तरी त्यांचा मुख्य काव्यरचनाकाल १८८५ ते १९०५ हाच होय. या काळातील त्यांच्या सुमारे १३५ कविता आज उपलब्ध आहेत. नागपुरास असताना रेव्ह. टिळक व कवी वसंत यांचा सहवास त्यांना लाभला होता. काव्य हे त्यांचे जीवनध्येय असल्याने स्वाभाविकपणेच त्यांनी काव्यरचनेच्या नव्या वाटा चोखाळल्या. या प्रयत्नात प्रारंभीच्या संस्कृत काव्याचा आदर्श अल्पकालीन ठरला व पूर्वकालीन मराठी काव्य प्रभावशून्य ठरले. परंतु इंग्रजीतील स्वच्छंदतावादी मनोवृत्तीच्या वर्डस्वर्थ, शेली आणि कीट्स यांसारख्या कवींचे काव्य मात्र त्यांना प्रेरक व अनुकरणीय वाटले.

नवीन काव्याबरोबरच काव्यविषयक नवा दृष्टिकोन व नवी अभिरुची निर्माण करण्याची जबाबदारी नव्या कवींवर पडते. केशवसुतांनी अशा जबाबदारीने लिहिलेल्या कवितांपैकी, ‘स्फूर्ति’ (१८९६), ‘कवितेचे प्रयोजन’ (१८९९), ‘आम्ही कोण?’ (१९०१) आणि ‘प्रतिभा’ (१९०४) या कविता महत्त्वाच्या आहेत. व्यापक मानवी जीवनाच्या संदर्भात कवी व कवित्व यांच्या कार्याची आदर्शवादी भूमिका केशवसुतांनी मांडलेली असल्यामुळे त्या भूमिकेत चिरंतन प्रेरकता जाणवते. त्यांच्या निसर्गविषयक कवितांवर वर्डस्वर्थ व एमर्सन यांच्या विचारांचा परिणाम झालेला दिसतो. सृष्टीतील सौंदर्य काव्याला प्रेरक ठरते व त्याच्या मानवी जीवनातील विषमतेचा अभाव असल्याने निसर्गसहवास सुखद ठरतो, अशा दृष्टीने केशवसुत निसर्गाकडे बघतात. ‘भृंग’ (१८९०), ‘पुष्पाप्रत’ (१८९२) व ‘फुलपांखरूं’ (१९००) या त्यांच्या काही महत्वाच्या निसर्गकविता होत.

क्रांतिकारक सामाजिक विचार ओजस्वीपणे व्यक्त करणाऱ्या त्यांच्या प्रसिद्ध कविता म्हणजे, ‘तुतारी’ (१८९३), ‘नवा शिपाई’ (१८९८) व ‘गोफण केली छान’ (१९०५) या होत. अशा या महान कवीचे ७ नोव्हेंबर १९०५ रोजी निधन झाले.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशील श्री. गणेश बजानन पाटील वगैरे ८ यांच्या मालकीच्या व ताबेकब्जाच्या मौजे धोकवडे भूमापन क्रमांक व उपविभाग ४३९, ४३२/१, ४३२/२, ४३६, ४३८ या शेत जमीन मिळकतींमध्ये जाण्यायेण्याकरीता १) श्री. भूपेंद्र दामोदर शाह, २) श्री. ललित दामोदर शाह, ३) श्री. अजय दामोदर शाह, ४) श्रीमती रश्मिता किरणा शाह यांच्या मालकीच्या खाली वर्णन केलेल्या मौजे धोकवडे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड या मिळकतीमधून निरंतर वहिवाटीचा रस्ता आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| धोकवडे | ४३७ | ०-२०-०० | ४-०९ |

आमचे अशिल त्यांच्या शेतजमीन मिळकतींमध्ये पूर्वापारपासून पश्चिम दिशेस असलेल्या अलिबाग-मांडवा रस्त्यावरून मौजे धोकवडे भूमापन क्रमांक व उपविभाग ४३७ मधून उत्तर दिशेच्या हद्दीच्या आंत लागून असलेल्या १२ फुट रुंदीच्या निरंतर वहिवाटीच्या रस्त्याने येत-जात आहेत. सदर निरंतर वहिवाटीच्या रस्त्यात आमच्या अशीलांचे कायदेशीर हक्क, हितसंबंध व अधिकार आहेत. तरी सदर मौजे धोकवडे भूमापन क्रमांक व उपविभाग ४३७ या जमीन मिळकतीसंबंधी कोणीही, कसलाही, कोणताही व्यवहार आमच्या अशीलांच्या निरंतर वहिवाटीच्या रस्त्याच्या हक्कास बाधा येईल अशा स्वरूपाचा करू नये. असा कोणताही व्यवहार आमच्या अशिलांवर बंधनकारक होणार नाही याची नोंद सर्वांनी घ्यावी. याउपरही कोणीही वर वर्णन केलेल्या जमीन मिळकतींबाबत व्यवहार केल्यास तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व आमचे अशील त्यांच्याविरूद्ध कायदेशीर कारवाई करतील व ती व्यक्ती प्रामाणिक खरेदीदार होणार नाही हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक : ०५-१०-२०२५

**(अॅड. अमर अशोक घरत)**
युगंधर सोसा. शॉप नं.०६,
युनियन बँकेशेजारी, ब्राम्हण आळी,
अलिबाग, जिल्हा-रायगड.
मो- ८८०५०३७४७४.

## ग्रुप ग्रामपंचायत देवळी
**ता.माणगाव, जि.रायगड**

### जाहिरात

दि. ०६/१०/२०२५

ग्रामपंचायत देवळी ता. माणगाव, जि. रायगड येथे महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.व्हीपीएम २६९९/ प्र.क्र.२०६ (१) दि.२१ जानेवारी २००० रोजीचे शासन निर्णयानुसार निश्चित करणे आलेल्या कर्मचारी आकृतीबंधना नुसार ग्रामपंचायत देवळी करिता ग्रामपंचायत शिपाई कर्मचारी या रिक्त पदाकरिता स्थानिक पात्र, इच्छुक उमेदवारांकडून दि. १५/१०/२०२५ रोजी दुपारी २.०० पर्यंत विविध अटी व शर्तीस अधीन राहणेचे अटीवर उमेदवारी अर्ज मागविणेत येत आहेत.

सदर पदाकरिता आवश्यक पात्रता व अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.
शैक्षणिक पात्रता:- किमान १० वी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक, उच्च शिक्षण, संगणक ज्ञान, मराठी टायपिंग असलेल्यास प्राधान्य देण्यात येईल.
वयोमर्यादा:- वयोमर्यादा किमान १८ वर्ष कमाल ३३ वर्ष
वेतन व भत्ते :- किमान वेतन ११६२५

**अटी व शर्ती :-**

१) अर्जदार स्थानिक रहिवासी असणे आवश्यक आहे. त्याबाबत अर्जासोबत पुरावे जोडणे आवश्यक आहे. २) पदाकरिता निश्चित करणेत आलेल्या शैक्षणिक पात्रतेबाबतचे रीतसर दस्तऐवज अर्जासोबत सादर करावेत.
३) उमेदवारांनी वयाबाबत जन्मदाखला किंवा वय सिद्ध करणारा पुरावा सादर करावा.
४) मुंबई ग्रामपंचायत नोकरी बाबत (सेवेच्या शर्ती) नियम १९६० नुसार विहित करण्यात आलेले नियम/सेवा शर्ती सदर पदासाठी लागू राहतील. त्याबाबतचे बंध पत्र सदर पदावर नियुक्ती झाल्यावर १००/- रुपयांचे मुद्रांकवर लिहून द्यावे लागेल.
(५) उमेदवारी अर्ज दि.१५/१०/२०२५ पर्यंत सायं.२.०० व कार्यालयीन वेळेत सादर करणे आवश्यक राहील. त्यानंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.
६) सदर पदाकरिता निवड करणेत आलेल्या उमेदवारास लेखी नियुक्तीपत्र देण्यात येईल.
७) सदर पदाच्या निवडीबाबतचे सर्व अधिकार ग्रामपंचायत देवळी यांस राहतील.

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत देवळी**
**ता.माणगाव, जि.रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत देवळी**
**ता.माणगाव, जि.रायगड**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र.४९३/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री.अकबर अली युनुस रोहेकर
वय ५७ वर्षे, धंदा शेती, — अर्जदार
रा. मु. पो. मोर्बा,
ता.माणगांव, जि.रायगड

विरुद्ध

१.निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा,
ता.माणगांव, जि.रायगड. — सामनेवाला
२.गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता.माणगांव, जि.रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. अकबर अली युनुस रोहेकर यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि.२९/०२/१९६८ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि.३०/०७/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि.२९/०२/१९६८ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. अकबर अली युनुस रोहेकर यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. २९/०२/१९६८ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव
ता. २९/०९/२०२५

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र.४९२/२०२५

मे.तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात

श्री. शौकत अली युनुस रोहेकर
वय : ६३ वर्षे, धंदा: शेती, — अर्जदार
रा. मोर्बा
ता. माणगांव, जि. रायगड

विरूद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा,
ता.माणगांव, जि.रायगड,
२.गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता.माणगांव, जि.रायगड. — सामनेवाला

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. शौकत अली युनुस रोहेकर याचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि.१६/०७/१९६२ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. ३०/०७/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि.१६/०७/१९६२ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. शौकत अली युनुस रोहेकर यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. १६/०७/१९६२ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव
ता. २९/०७/२०२५

सही
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

माझे अशिल श्री.कुलदीप भगवान बडेकर यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक श्री. समीर यशवंत साळोखे यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे भुतीवली, ता.कर्जत, जि.रायगड | ७/२ | ०.४८.८० यापैकी वरील जमीन मालक यांचा या मिळकतीत असणारा अविभक्त हिस्सा | ७.३७ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
दिनांक : ०५/१०/२०२५

**अॅड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु.पो.चिंचवळी ता. कर्जत
जि. रायगड
मो. नं. ९०४९४८६८०५

## जाहिर नोटीस

**माणगांव येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात**

रे.मु.नं.८३/२०२५

१) समिर सुरेश मुरूडकर वै. ३ — वादी

विरूद्ध

१) महाराष्ट्र सरकार तर्फे
माणगांव पोलिस ठाणे मु. माणगांव — प्रतिवादी
पो.ता.माणगांव जि.रायगड

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

वादी हे मौजे : रा.जुने माणगांव सुतारआळी, पो.ता.माणगांव, जि.रायगड येथील कायमचे रहिवाशी आहेत.

वादी यांचे वडील श्री. सुरेश गजानन मुरूडकर (सुतार ) हे सन २०१५ (दोन हजार पंधरा) साली बेपत्ता झालेले असुन ते कुठेही आढळून आलेले नाहीत म्हणुन माणगांव तालुका पोलिस ठाणे माणगांव यांचेकडे मिसिंग रजिस्टर नं.१०/२०१५ दिनांक: ०५/०५/२०१५ रोजी रितसर मिसिंग कप्लेंट मनुष्य बेपत्ता तक्रार मी दाखल केली होती. त्यामुळे वादी याचे वडीलांचा ''नागरी मृत्यु'' झाला आहे. असे घोषित करून मिळण्याकरीता सदरचा दावा दाखल केला आहे .

वादी यांनी स्पेसिफिक रिलीफ अॅक्ट १९६३ चे कलम ३४ व सी.पी.सी. कलम ९ प्रमाणे सिव्हिल डेथ डिक्लेरेशन ''नागरी मृत्यु'' झाला आहे असे घोषित करण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्यामुळे सदर दाव्यास कोणाचीही हरकत अगर अडथळा असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०१ महिन्याचे आत या कोर्टात हजर होऊन हरकती कळवाव्या आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु वादी यांचे हक्काबद्दल मागणी बाबत लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना श्री.सुरेश गजानन मुरूडकर (सुतार) यांचा नागरी मृत्यु झाला आहे असे घोषित करण्यात येईल. कळावे.

माणगांव
दि.०१/१०/२०२५

सही/-
**सह-अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व-स्तर**
**माणगांव-रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे वाकस, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./हि.नं. | एकुण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| श्री. गंगाधर कारभारी जाधव. | ५२/६/३ | खाता क्र. १००६४ मधील विक्री केलेले क्षेत्र ००-१३-०० हे.आर.पॉ. | ०-७५ |
| | ५२/७/९/१० /११/१३/क | खाता क्र.७७० मधील विक्री केलेले क्षेत्र ००-१०-०० हे.आर.पॉ. | ०-१३ |
| | एकुण क्षेत्र | ००-२३-०० हे.आर.पॉ. | |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०७/१०/२०२५

**अॅड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१,सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

दिनांक ०६/१०/२०२५

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे खांडसई ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - खांडसई ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | गट न./स. नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्री.शरद तुळशीराम किंजावडे | ६५/१ | ०-१३-१० | ०-०९ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहिवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्यूपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुरव्यासहीत ७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशिल सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण-पाली-सुधागड
दिनांक :०६/१०/२०२५

सही /-
**श्री.प्रभाकर कृष्णकांत भोईर**
अॅडव्होकेट
मु.पो.नविन पनवेल ता.पनवेल जि.रायगड
मो.बा.नं.८१४९६५१५०८

## उपविभागीय अधिकारी पेण यांचे कार्यालय, भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अंतर्गत कलम १९ ची अधिसूचना

याअर्थी, समुचित शासन असलेल्या रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश 'उक्त अधिनियम' असा केला आहे) यांच्या कलम १३ च्या पोटकलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना दिनांक २६/१२/२०२४ अन्वये कलम ११ ची अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेली अधिसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीनमध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतींच्या प्रयोजनासाठी 'पुनर्वसाहत क्षेत्र' म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्यार्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ग) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, पेण यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**
**जमिनीचे वर्णन**
**गाव ओढांगी, तालुका-पेण, जिल्हा-रायगड**

| अ.क्र. | स.नं.ग.नं. | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| १ | १९१ | ०.२१.६० |
| | एकूण | ०.२१.६० |

**अनुसूची-दोन**
**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव** : पेण तालुक्यातील मौजे ओढांगी, क्षेत्र ०.२१.६० हे.आर. उरण उसर प्रोपेन पाईप लाईनच्या एस.व्ही. स्टेशन (Sectionalizing Value Station) च्या बांधकामासाठी भूसंपादन करणेकामी प्रयोजन.

**प्रकल्प कार्याचे वर्णन :** पेण तालुक्यातील मौजे ओढांगी, क्षेत्र ०.२१.६० हे.आर. उरण उसर प्रोपेन पाईप लाईनच्या एस.व्ही. स्टेशन (Sectionalizing Value Station) च्या बांधकामासाठी भूसंपादन करणेसाठी आवश्यक आहे.

**समाजाला मिळणारे लाभ :** करांच्या माध्यमातून राज्य सरकारच्या महसुलाची निर्मिती, अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती आणि सामाजिक आर्थिक विकास साध्य करणे.

**अनुसूची- तीन**

**बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :-** निरंक

**अनुसूची चार**

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :-**महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ दि. १० ऑक्टोबर २०२४ अन्वये भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वासहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम १० क द्वारे लोकहितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण २ आणि प्रकरण ३ च्या तरतुदी लागू करण्यापासून सूट दिली आहे.

ठिकाण : पेण
दिनांक : २९/०९/२०२५

सही/-
**(प्रविण ज्ञानू पवार)**
उपविभागीय अधिकारी पेण
उपविभाग पेण

**क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/१५४/१२६२/२०२५**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे मालक श्री. रमेश शांताराम कदम, रा.तिवणे, ता.कर्जत, जि.रायगड यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे मुळगाव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र(हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| ३५ | ८ | ०.०८.८० | १.२० |

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तकारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. ७/१०/२०२५

**अॅड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस, एल. एल. बी
प्रभात अपार्टमेंट, रूम नं.४, दुसरा मजला,
सुनिल चिक्कीजवळ, ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं.९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

**पनवेल येथील मे. उपविभागीय अधिकारी सो, यांचे कोर्टात.**

फेरचौकशी अर्ज क्र. /२०२५

श्री. जयवंत शालिक पाटील — अर्जदार
वय : ४३, धंदा शेती,
रा. मु.पो. नविन रिस,
ता.पनवेल, जि.रायगड

विरूद्ध

१) श्री. प्रभाकर नामदेव तायडे,
वय : ६३, धंदा : नोकरी,
रा. माया रेसिडन्सी, ए - १०५,
क्रिस्टल पार्कच्या बाजुला,
मु. विचुंबे, ता. पनवेल,
जि. रायगड. — सामनेवाले
२) तलाठी सजा आपटे,
रा. आपटे, ता. पनवेल,
जि. रायगड.
३) मा. मंडळ अधिकारी कर्नाळा,
मु. पनवेल, ता. पनवेल,
जि. रायगड.

**मा.अप्पर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचेकडील हक्कनोंद अपील क्र.९६/२०२४ मध्ये दिनांक २५/०६/२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशाप्रमाणे फेरचौकशी करणेकरीता अर्ज.**

**सही/-**
**महसूल सहाय्यक**
**उपविभाग अधिकारी**
**पनवेल विभाग पनवेल**
२६/९/२०२५

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**
**जाहिर नोटीस**

ज.म.र अर्ज ३३३/२०२५

प्रति,
श्रीम.आयशा मतीन फराश. (लग्नानंतरचे नाव) — अर्जदार
श्रीम.आयशा दाउद दामाद, (लग्नापुर्वीचे नाव)
रा.आस बिल्डींग तळमजला, शिवाजी चौक पेण, जि. रायगड

विरुद्ध

मुख्याधिकारी,
नगर परिषद मुरुड. — सामनेवाला
ता.मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. १८/०६/१९७६ रोजी मौजे मुरुड, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद नगर परिषद मुरुड, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. १८/०६/१९७६ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक ११/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०३/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# निवडक

## अंडरपास बांधण्याची मागणी

**पनवेल :** सुकापुर बालाजी सिम्फनी रस्त्याजवळ मोठ्या प्रमाणात होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी या ठिकाणी अंडरपास (भुयारी मार्ग) बांधण्याची मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या पनवेल महापालिका महिला जिल्हाध्यक्ष हर्षला योगेश तांबोळी यांनी पत्राद्वारे केली आहे. आदई सर्कल ते बालाजी सिम्फनी सुकापुर या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या रस्त्याची परिस्थिती वाईट आहे. त्यामुळे रहिवासी आणि प्रवासांना रोज अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे आपत्कालीन रुग्णवाहिका रुग्णालयात पोहोचण्यास विलंब होतो. शालेय विद्यार्थ्यांना देखील वाहतूक कोंडीचा फटका बसतो. प्रवाशांना वेळेवर कामावर आणि घरी जाण्यास विलंब होतो. सायंकाळच्या सुमारास वाहतूक कोंडीत एक तास जातो. रस्ता देखील छोटा असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. रस्ते सुधारणा आणि भुयारी मार्गाचे बांधकाम प्राधान्याने हाती घेतले तर वाहतूक कोंडीच्या समस्या आपोआप सुटतील आणि सुरळीत कनेक्टिव्हिटी, सार्वजनिक सुरक्षितता आणि हजारो दैनंदिन प्रवाशांना सुविधा मिळेल असे हर्षला तांबोळी यांनी सांगितले.

## फुंडे महाविद्यालयात कार्यशाळा

**उरण :** रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, महालन विभाग, फुंडे येथे बौद्धिक संपदा हक्क व नवोन्मेष या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा संशोधन प्रवर्तन व नीतिशास्त्र समिती तसेच आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडली. संसाधन व्यक्ती म्हणून डॉ. प्रमोद ठाकूर एम.पी.ए.एस.सी. कॉलेज, पनवेल व डॉ. शंकर कोंडा के. जे. सोमैया कॉलेज, कोपरगाव यांनी सहभागी विद्यार्थ्यांना व संशोधकांना पेटंट प्रक्रिया, कायदेशीर संरक्षणाची गरज व नवोन्मेषी कल्पनांचे व्यावसायिकीकरण याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे समन्वयन डॉ. अनिल पालवे, डॉ. गुरुमीत वाधवा, डॉ. आर. बी. पाटील, डॉ. एस. एम. तांदळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. प्रियांका ठाकूर व डॉ. श्रेया पाटील यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. एस. एम. तांदळे व डॉ. ए. एम. पालवे यांनी केले. आयोजन समितीत गजानन चव्हाण, अर्जुन पाटील, डॉ. झेलम झेंडे, भूषण ठाकूर, दिक्षिता म्हात्रे, रश्मी पुरके यांचा समावेश होता. राज्यातील विविध महाविद्यालयांतून १३० विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला होता.

## माणगावात नेत्र तपासणी

**माणगाव :** शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव यांच्यातर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन बुधवार दि. ८ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत जुने एसटी स्टँड माणगाव जवळ वृत्तपत्र विक्रेते नितीन मेथा यांच्या बाजूला असणाऱ्या महेंद्र पितांबर मेथा यांच्या प्रशस्त जागेत हॉलमध्ये करण्यात आले आहे. सदर शिबिराचा लाभ जास्तीत जास्त गरीब गरजू लोकांनी घ्यावा असे आवाहन विजय मेथा यांनी केले आहे. आतापर्यंत २८९२ हुन अधिक मोतीबिंदू असणाऱ्या रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. या शिबिराला दरमहिन्याला नेत्ररुग्णांचा मोठा असा प्रतिसाद लाभत आहे. जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा समजून आपण हे सामाजिक उपक्रम राबवित असल्याचे आयोजक मेथा यांनी सांगितले. सदर शिबीर यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी मेथा परिवारातर्फे विजय मेथा, मनीष मेथा, विधिता मेथा, सुप्रिया शिंदे यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल टीम विशेष परिश्रम घेत आहेत.



## काँग्रेसच्या आढावा बैठकीला प्रतिसाद

**पनवेल :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी तातडीची आढावा बैठक उरण तालुक्यातील खोपटे येथे रविवारी झाली.या आढावा बैठकीला कार्यकर्त्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला. या बैठकीला महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. काँग्रेसचे प्रदेश कमिटी सरचिटणीस आणि निरीक्षक डॉमनिक डिमेलो, मिलिंद पाडगावकर, डॉ. मनीष पाटील, उरण विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष विनोद म्हात्रे, अखलाख शिलोत्री, उरण तालुका महिला अध्यक्ष रेखाताई घरत, तसेच तालुक्यातील काँग्रेसचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नोकरीची संधी -** सफाई कर्मचारी (बर्गर्स आणि बूच, रांजणपाडा, अलिबाग) आमच्या टीममध्ये सामील होण्यासाठी आम्ही एक मेहनती आणि प्रामाणिक व्यक्ती शोधत आहोत. तपशील: पगार: ₹१३,०००/ महिना+ टिप्स/सेवा (७%) राहण्याची व्यवस्था आणि जेवण साप्ताहिक सुट्टी : मंगळवार कामाचे तास : दुपारी १२ ते रात्री ११ (दररोज किमान २ तासांच्या ब्रेकसह) व्हाट्सअॅपवर कॉल करा : ७५०६९५४६११/ ९९३०६३४००३
- **खुद्द अलिबाग मध्ये १ बेड हॉल किचन फ्लॅट भाडेतत्त्वावर** द्यावयाचा आहे. भाडे ₹ १५.००० डिपॉझिट ₹ ६०,०००. एजंट क्षमस्व फोन नंबर ९८६९४५९०६३.
- **पाहिजेत!!! अलिबाग येथील दुकानात आणि टायर साठी** अनुभवी किंवा फ्रेश मुले हवी आहेत. कॉम्प्युटर बिलिंग साठी मुले हवी आहेत.संपर्क:८१४९४८०६८४
- **पॅकिंगसाठी बाई पाहिजे.** ७३७८४८०१५१
- **ड्रायव्हर पाहिजे.** ७०६६१३८३६८
- **नारळाचे सुके गोटे पाहिजे.** ७०६६१३८३६८
- **अकाऊंटंट पाहिजे.** पात्रता- Bcom, Tally अनुभव- ५ वर्षे ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार २५००० महिना, Contact- 9823585321
- **आवश्यक :** सहाय्यक कर्मचारी खाजगी बंगल्याच्या साफसफाईसाठी आणि देखभालीसाठी जबाबदारी आणि विश्वासू व्यक्तींची आवश्यकता आहे. दैनंदिन घरकाम, सामान्य देखभाल आणि पाहुण्यांच्या व्यवस्थेत मदत करणे या कर्तव्यांमध्ये समाविष्ट आहे. पूर्णवेळ/राहणे पसंत. पूर्वीचा अनुभव इष्ट. स्थान : नागाव, संपर्क : ९८२०४१४८११ बैठकीची तारीख ११ ऑक्टोबर २०२५, सकाळी ११ वाजल्यापासून सुरू. किमान वयोमर्यादा १८ ते ३५ वर्षे आहे.


जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# शेतजमिनीला सोन्याचा भाव

## विक्री करण्याऐवजी भाड्याने देण्याचा ट्रेंड; शेतकऱ्यांच्या जनजागृतीला यश

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण परिसरात येऊ घातलेल्या विविध प्रस्तावित प्रकल्पांसाठी परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी व संपादन करण्यासाठी सरकार व त्यांच्या हस्तकांकडून जोरदार प्रयत्न सुरू आहेत. मात्र, काही सामाजिक संस्था व स्थानिक पुढाऱ्यांच्या जनजागृतीमुळे येथील शेतकऱ्यांनी जमीनी विक्री करण्याऐवजी जमीनी भाड्याने देण्याचा नवा ट्रेंड उदयास येऊ लागला आहे. शेतकऱ्यांच्या जमिनींचे मालकी हक्क अबाधित राखण्यासाठी सुरू झालेला ट्रेंडचे सर्वच स्तरावर स्वागत केले जात आहे.



उरण परिसरात मागील वीस वर्षांत महामुंबई सेझ, नवीमुंबई सेझ, विरार-अलिबाग कॉरिडॉर, खोपटा नवनगर, अटल सेतू, नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, तिसरी मुंबई (केएससी), नैना आदी विविध खासगी, शासकीय प्रकल्प प्रस्तावित आहेत.यापैकी दहा हजार हेक्टर क्षेत्रावरील मुकेश अंबानी यांच्या रिलायन्सचा महामुंबई सेझ शेतकऱ्यांच्या कडव्या विरोधानंतर रद्द झाला आहे. मात्र प्रकल्पाची घोषणा आणि रद्द झाल्यानंतरही येऊ घातलेल्या विविध प्रस्तावित प्रकल्पांसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन, खरेदीचे व्यवहारात वीस वर्षांत चांगलीच तेजी आली होती. शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी करण्यासाठी दलालांचा सुळसुळाट झाला आहे. या दलालांच्या भुलथापांना व आमिषाला बळी पडून आपल्या पिकत्या जमिनी शेतकऱ्यांनीही मागचा पुढचा अथवा भावी पिढीच्या भविष्याचा कोणताही विचार न करताच जमीनी कवडीमोल भावाने बड्या भांडवलदारांना विक्री केल्या आहेत. त्यामुळे उरण परिसरातील हजारो हेक्टर जमीनीचे मालक आता स्थानिक शेतकऱ्यांच्या ऐवजी परप्रांतीय भांडवलदार बनले आहेत. सिडकोने नुकतेच भूखंड वाटप आणि भाडेपट्टा करारनामा निष्कासित करणेबाबत जाहीर सूचनेच्या शुद्धीपत्रकानंतर उघडकीस आले आहे. या शुध्दी पत्रातील परप्रांतीय भांडवलदारांच्या नावांची यादी सर्वांनाच विचार करायला लागणारी आहे.

मात्र ज्या शेतकऱ्यांनी थोड्या पैशासाठी जमिनी विकल्या. त्यांचे पैसेही मौजमजा करुन, गाड्या घेऊन, बंगले बांधून संपून गेले आहेत. मात्र ते आपल्या वडिलोपार्जीत जमिनी कायमच्या गमावून बसले आहेत. या जमिनीचे मालकच उपरे परप्रांतीय बनल्याने आता सिडकोकडून मिळणारे कोट्यवधी किमतीचे भूखंड आणि इतर लाभही मुळ शेतकऱ्यांच्या ऐवजी परप्रांतीय भांडवलदारांनाच मिळणार आहेत.

यामुळे विविध सामाजिक संस्था, निस्वार्थी नेते, पुढाऱ्यांनी केलेल्या आवाहन आणि जनजागृतीमुळे उरण परिसरातील ५० टक्क्यांहून अधिक जमीनी शेतकऱ्यांच्या मालकीच्या उरलेल्या आहेत.

जमीनी भाड्याने देऊन त्यातून चांगले आर्थिक उत्पन्न मिळू शकते याची जाणीव एव्हाना शेतकऱ्यांना झाली आहे. अशा शेकडो शेतकऱ्यांनी जमीनी विक्री करण्याऐवजी भांडवलदार, व्यावसायिकांना भुई भाड्याने देण्याचे धोरण अवलंबिले आहे. आजच्या घडीला सोन्यापेक्षा ज्यादा भाव जमीनीला मिळत आहे. अशी माहिती एमएमआरडी केआरसी (कर्नाळा, साई, चिरनेर ) नवनगर विरोधी समितीचे सरचिटणीस रुपेश पाटील यांनी यांनी दिली.

तर उरण परिसरातील शेतकरी शेतजमीन विक्री करण्याऐवजी भांडवलदार, व्यावसायिकांना भुई भाड्याने देण्यासाठी आग्रही भूमिका घेत आहेत. कंटेनर यार्ड, कंपन्यांना प्रती स्क्वेअर फूट चार रुपये तर एकरी एक लाख ६० हजार रुपये प्रति महिना भाडे दराने जमीनीचे भाडे मिळत असल्याने शेतकरीही भाड्याने देण्यालाच अधिक प्राधान्य देत असल्याची माहिती शेतकरी व व्यावसायिक जे. डी. जोशी यांनी दिली.

> जमिनी भाड्याने दिल्यामुळे मालकीही कायम राहात असून महिन्यांकाठी लाखो रुपयांचे भाडेही मिळत असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी मदत होऊ लागली आहे.
>
> **- सुधाकर पाटील**
> **अध्यक्ष, उरण सामाजिक संस्था**

मागील २० वर्षातील कालखंडात उरण परिसरातील निम्म्याहून अधिक जमीनींची विक्री दलालांमार्फत बडे भांडवलदार, व्यावसायिकांना करण्यात आली आहे. मात्र, जनजागृतीनंतर शेतकऱ्यांच्या उर्वरित जमिनी वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना जमिनीची विक्री करु नये असे मागील वीस वर्षांपासूनच वारंवार केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत अनेक शेतकऱ्यांनी जमीनीची विक्री न करता जमीन भाड्याने देण्यालाच अधिक प्राधान्य दिले आहे.

## दिपक फाऊंडेशनतर्फे आरोग्य तपासणी



**। खांब । प्रतिनिधी ।**

दिपक नायट्रेट कंपनी धाटाव व दिपक फाऊंडेशन रोहा यांच्या वतीने करण्यात आली विद्यार्थी वर्गाची आरोग्य तपासणी करण्यात आला. सामाजिक बांधिलकीच्या नात्यातून कार्य करीत असणाऱ्या दिपक फाऊंडेशन यांच्या वतीने नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथील विद्यार्थी वर्गाची आरोग्य तपासणी कार्यक्रम (दि.६) रोजी करण्यात आला. यावेळी दिपक फाऊंडेशनचे अजय आवाडे, डॉ. प्रियांका नरवणकर, अश्विनी म्हसकर, उत्कर्षा म्हस्के, अंकिता ठाकूर, मारूती निगडे उपस्थित होते. या अभिनव उपक्रमाबाबत दिपक जगताप यांनी आभार व्यक्त केले.

## पनवेल ते पंढरपूर रेल्वे सेवा सुरु करा

**पनवेल :** पंढरपूरचे विठ्ठल रुक्मिणी मंदिर कोट्यवधी भाविकांचे दैवत आहे, महाराष्ट्रातील या महत्त्वपूर्ण धार्मिक स्थळाला दक्षिण काशी म्हणूनही ओळखले जाते. महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे इष्ट दैवत आहे. त्यामुळे पनवेल ते पंढरपूर अशी रेल्वे सेवा सुरु केल्यास रेल्वे विभागाच्या महसुलात वाढ होईलच शिवाय पनवेल रायगड, नवी मुंबईच्या जनतेस पंढरपूरच्या विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनास जाण्यासाठी सुलभ प्रवास होईल याकरिता पनवेल ते पंढरपूर रेल्वे सेवा सुरू करण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे पनवेल शहर अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी रेल्वे विभागाकडे केली आहे.



● लक्ष्मी पूजनाकरीता बंगाली समाज काली मातेच्या मूर्तीची स्थापना करतात. त्यासाठी काली मातेचे मुखवटे बनवण्याकरता कारगीर सज्ज झाले आहेत. (छायाचित्र : राजेश डांगळे)

## पालीवाला महाविद्यालयात आरोग्य तपासणी

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

सुधागड एज्युकेशन सोसायटीचे शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालय वाणिज्य, विज्ञान आणि कला महाविद्यालय पाली येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत १ ऑक्टोबर रोजी सामान्य आरोग्य तपासणी व हिमोग्लोबिन तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविकात डॉ. अनिल झेंडे यांनी हिमोग्लोबिन तपासणी, मधुमेह, स्वच्छता पंधरवडा ब्रॅण्ड अॅबेसिडर, साक्षरता अभियान, याविषयी आपले मत मांडले. प्राथमिक आरोग्य केंद्र पाली आरोग्य सहाय्यक प्रशांत वारगुडे यांनी निरोगी आरोग्य, घरचं अन्न चांगलं अन्न, कॅन्सर मुक्त आरोग्य, मानसिक आजार, रोगप्रतिकारशक्ती, आरोग्य विभागाची भूमिका, मलेरिया, स्वच्छ परिसर, शोषखड्डा वापर, शौचालयाचा वापर, श्वसनाचे विकार, आरोग्य तपासणीचे फायदे, डोळ्यांचे आजार व तपासणी याविषयी अनमोल मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले.

या सामान्य आरोग्य तपासणी शिबिर व हिमोग्लोबिन तपासणी शिबिरामध्ये प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनींची अशा एकूण २०० जणांची यशस्वी तपासणी करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. सुधाकर लहुपचांग, डॉ. सोमनाथ निर्मल, डॉ. आकाश वैद्य, तुकाराम मोकल, प्रशांत वारगुडे, विशाल महाजन, योगिता पिलणकर, अंकिता जाधव, उज्वला तांबडे, लक्ष्मण करे, राकेश तांबडे, विशाल महाजन, लिनताज उके, डॉ. अंजली पुराणिक, स्नेहल बेलवलकर, डॉ. भारती आरोटे, प्रा. अस्मिता पाटील, प्रा. विशाखा मानकामे, प्रा. दिपाली बांगारे, प्रा. भक्ती साजेकर, प्रा. रुकसार महाडक, प्रा. हर्षिता घोसाळकर उपस्थित होते.

## रमेश भोसले यांचे निधन

**सुकेळी :** मढाळी ता. रोहा येथील रमेश भोसले यांचे वयाच्या ६२ व्या वर्षी रविवार ( दि. ५ ) रोजी अल्पशा आजाराने झाले. यांच्या पश्चात २ मुलें, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी मंगळवार (दि.१४) ऑक्टोबर रोजी तर बारावे गुरूवार (दि. १६ ) ऑक्टोबर रोजी राहत्या घरी मढाळी येथे करण्यात येणार असल्याचे भोसले परिवाराकडून सांगण्यात आले आहे.

## गजनफर कलाब सेवानिवृत्त

**। रोहा । प्रतिनिधी ।**

पीएम श्री नगरपरिषद उर्दू शाळा रोहा क्रमांक ४ चे मुख्याध्यापक गजनफर हसन कलाब नुकतेच ३९ वर्षांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेतून निवृत्त झाले. शाळेमध्ये त्यांच्या सेवापूर्ती समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या छोटेखानी कार्यक्रमात कलाब यांनी शाळेच्या सर्वांगीण उन्नतीसाठी घेतलेली मेहनत व विद्यार्थी घडविण्यासाठी घेतलेली पराकाष्ठा या संदर्भात उपस्थित मान्यवर शिक्षक वर्गाने माहिती देत त्यांचा गुणगौरव केला.

याप्रसंगी अलीम मुमेरे, महंमद डबीर, अहमद दर्जी, फरहान खामकर, अब्दुल रोगे, उस्मान रोहेकर, तय्यब अली मुमेरे, इम्तियाज नाडकर, मजहर सिद्दीक, सनाउल्ला दर्जी, सैफुल्ला फिरफिरे, मंजर शरीफ, शाहीद कलाब, गावडे गुरुजी, सुरेश मोरे, हाजी जळगावकर, किशोर तावडे आदी मान्यवर व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मैमुना जळगावकर, नजीर मशालकर, इनायत कोंडविलकर, सबा कारानी, निलोफर अधिकारी, रियाज मोमीन, सना सिद्दीकी, नाझिया शेख,जुवेरिया चोगले, जाहेदा पठाण, हीना खान, मासूमा पटेल, आशना सिद्दीक आदी शिक्षकवृंदानी मेहनत घेतली.

## उरण ते शिर्डी पदयात्रेचे आयोजन

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील श्री साईराम पदयात्रा मंडळ गेली चोवीस वर्षे श्री साई मंदिर अंबिकावाडी उरण ते शिर्डी अशी पदयात्रा काढतात. या मंडळातर्फे रविवार दि.५ ते सोमवार १३ ऑक्टोंबर या कालावधीत उरण ते शिर्डी पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. पदयात्रेसाठी अध्यक्ष संदीप ठाकूर, लक्ष्मीकांत पाटील, विजय घरत, गणेश पाटील, हिम्मत पाटील, दत्तात्रेय भोईर, कपिल म्हात्रे, उमेश भोईर, दीपक म्हात्रे, चाया म्हात्रे, मधुकर पाटील, नागूबाई घरत, शांताताई संजय भोईर, प्रमिला घरत, नयना नाईक, निराबाई घरत, कारसेवक साईभक्त मेहनत घेत आहेत.

## म्हसळ्यातवन्यजीव सप्ताहानिमित्त चित्रकला स्पर्धा

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा तालुक्यातील केंद्र वरवठणे रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बनोटी या शाळेत शनिवार (दि.४) ऑक्टोबर रोजी म्हसळा वनविभागाचे वनक्षेत्रपाल संजय पांढरकामे यांच्या मार्गदर्शनाखाली म्हसळा बिटाचे वनपाल वैभव शिंदे यांच्या



उपस्थितीत बनोटी शाळेत वन्यजीव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

वन्यजीव सप्ताहाचे निमित्ताने विद्यार्थ्यांना जंगली पशू, पक्षी, प्राणी, वनस्पती, झाडे, वेली, वृक्ष यांची माहिती देण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पेण, पेन्सिल वाटप करण्यात आले. यावेळी वैभव शिंदे, लक्ष्मण राठोड, किरण बिन्नर, जयसिंग बेटकर, रामेश्वर गायकवाड, विद्यार्थी, शिक्षक, पालक उपस्थित होते.

**मांडला येथे भव्यदिव्य सोहळ्याचे आयोजन | विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव**

# आगरी साहित्य संगम उत्साहात

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

आगरी समाजाची भाषा, परंपरा आणि संस्कृती यांचा संगम घडवणारा अखिल भारतीय आगरी साहित्य संस्थेचा साहित्य संगम सोहळा मांडला ता. मुरुड येथील ग्रीन किंग रिसॉर्ट येथे शेकडो साहित्यिक व मान्यवरांच्या उपस्थितीत दिमाखात पार पडला.

आगरी समाज श्रम, संस्कृती आणि परंपरेचे दर्शन आगरी समाज हा परंपरेने समुद्राशी, श्रमाशी आणि मातीतल्या गंधाशी जोडलेला आहे. समुद्रकिनारी शेती, मासेमारी, मीठउद्योग, नारळ-काजू शेती या सर्व जीवनशैलीने आगरी संस्कृती घडवली आहे. या समाजाची कष्टाळूपणा, प्रामाणिकपणा आणि



सांस्कृतिक अभिमान ही वैशिष्ट्ये आजही तितकीच तेजस्वी आहेत. त्यांची भवर नृत्य, लोकगीते आणि आगरी बोलीची गोडी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशात अमूल्य ठेवा म्हणून ओळखली जाते. या परंपरेला साहित्यिकांचा बळकट हातभार लाभत असल्याने आगरी समाजाचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचत आहे. या भव्य सोहळ्यातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले की आगरी अस्मिता अमर आहे. साहित्य, संस्कृती आणि समाजकार्य यांचा संगमच आगरी समाजाला बलशाली बनला आहे.

या सोहळ्याचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ साहित्यिक अमृत पाटील यांनी भूषविले होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये अलिबाग नगरपालिकेच्या माजी उपनगराध्यक्षा मानसी म्हात्रे, कैलास पिंगळे, सुरेश भोपी, चंद्रकांत पाटील, मिलिंद खारपाटील, अॅड. राकेश पाटील, धम्मशील सावंत आदी मान्यवरांचा समावेश होता.

> तुम्ही उच्चशिक्षित व्हा आणि तुमच्या साहित्यामधून समाजापर्यंत समृद्ध विचार पोहोचवा. आगरी साहित्य दालन दिवसेंदिवस अधिक समृद्ध होत राहावे, हेच आमचे अपेक्षित ध्येय आहे.
>
> - अॅड. मानसी म्हात्रे

सांस्कृतिक गोडवा आणि सन्मानाने कार्यक्रमाची सुरुवात वावे ग्रामस्थांच्या गायनाने आणि भवर नृत्याने झाली. आगरी समाजाची सांस्कृतिक परंपरा यातून उलगडून दिसली. त्यानंतर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना शाल, पुष्पगुच्छ, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. त्यामध्ये ज्येष्ठ साहित्यिक सुरेश भोपी, कृष्णा जोशी, मारुती बागडे, अरुण द. म्हात्रे, प्रा. संदेश पाटील, जयंत पाटील, विकास पाटील, चंद्रकांत कांडपिले यांचा समावेश होता.

या सोहळ्यात नंदेश गावंड लिखित आगरासत्र या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृप्ती गावंड यांनी केले. शेवटी भजनाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

# दिवाळीपूर्वी रस्त्यांवरील खड्डे भरा

## ● अन्यथा खड्ड्यात करणार अभ्यंगस्नान; मनसेकडून सार्वजनिक बांधकाम उपविभागाला निवेदन



। गुहागर । प्रतिनिधी ।

गुहागर शहरांमधील रस्त्यांवर पडलेले खड्डे दिवाळीपूर्वी त्वरित व व्यवस्थित भरावे. याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तालुकाध्यक्ष सुनील हळदणकर यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग गुहागर यांना निवेदन सादर केले आहे. गुहागर शहरांमधील रस्त्यांवर पडलेले खड्डे दिवाळीपूर्वी न भरल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते दिवाळीच्या दिवशी रस्त्यावरील प्रत्येक खड्ड्यात अभ्यंगस्नान करतील, असा इशारा मनसे गुहागर तालुकाध्यक्ष सुनील हळदणकर यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग गुहागरच्या अधिकाऱ्यांना दिला आहे.

या निवेदनात पुढे म्हटले आहे की, गुहागर शहर हे शासकीय तसेच पर्यटनाच्या दृष्टीने गुहागर तालुक्यातील अत्यंत महत्त्वाचे ठिकाण आहे. मात्र दुर्दैवाची बाब अशी आहे की, याच शहरातील रस्ते सध्या खड्डेमय अवस्थेत आहेत. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. याचा थेट परिणाम पर्यटनावर तसेच शहरातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होत आहे. या रस्त्याच्या दुरुस्ती संदर्भात अनेक वेळा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने निवेदने सादर करण्यात आली होती. तरीही आजतागायत याची दखल घेण्यात आलेली नाही. इतक्या महत्त्वाच्या ठिकाणी रस्त्यांची दुर्दशा झाल्याने जनजीवन विस्कळीत होण्यास सार्वजनिक बांधकाम उपविभागच जबाबदार ठरेल. यामुळे कोणताही अपघात घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी देखील आपल्या विभागाची असेल. जर आपण दिवाळीपूर्वी गुहागर शहरातील सर्व रस्त्यांवरील खड्डे व्यवस्थित बुजवले नाहीत तर महाराष्ट्र नवनिर्माण सेना त्या प्रत्येक खड्ड्यात दिवाळीच्या दिवशी अभ्यंगस्नान करेल, याची नोंद घ्यावी. म्हणूनच आपण त्वरित याकडे लक्ष घालून रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम सुरू करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

या रस्त्यावरून नागरिकांना चालणेही मुश्किल झाले आहे. वाहने चालवताना वाहन चालकांना कसरत करावी लागत आहे. तरी या संदर्भात त्वरित कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.


हे निवेदन देताना तालुकाध्यक्ष सुनील हळदणकर, उपतालुकाध्यक्ष प्रसाद विखारे, गुहागर शहर अध्यक्ष अभिजीत रायकर, गुहागर तालुका विद्यार्थी सेना अध्यक्ष प्रथमेश रायकर, गुहागर तालुका सांस्कृतिक विभाग राहुल जाधव, महाराष्ट्र सैनिक दर्शन जांगळी, अक्षय जोशी आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**७ ऑक्टोबर**

१) श्री.मदन विठ्ठल माळी, मु थळपेठ, अलिबाग, ६-१०-१९५२
२) श्रीम. शैलजा शशिकांत म्हात्रे थळ, अलिबाग, ७-१०-१९५६
३)श्रीम.केतकी केशव टिल्लू मु.थळ, अलिबाग ७-१०-१९६१
४)श्री.विजय आनंद महाजन चेंढरे, अलिबाग ७-१०-१९४७

### सुवर्णकण



चमत्कार करील तोच सत्पुरुष, संत किंवा साधू ही कल्पना खोटी आहे संतांच्या केवळ सहवासाने, उपदेशाने साधकाचा जीवन विषयक दृष्टिकोन बदलतो आणि खऱ्या आनंदाचा स्पर्श होतो हाच संतांचा प्रसाद याच प्रसादात ऐश्वर्य व सौभाग्य आहे.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण.**

## तरुणीसह तिच्या आईवर सशस्त्र हल्ला

**ठाणे** : अर्नाळा येथील बंदरपाडा गावातील एका घरात घुसून शसस्त्र हल्लेखोराने झोपलेल्या तरुणीवर चॉपरने वार केले. यावेळी तिला वाचवायला गेलेल्या तिच्या आईवरही या हल्लेखोराने हल्ला केला. यात दोघीही गंभीर जखमी झाल्या. नेत्रा गोवारी (तरुणी) व लीला गोवारी (आई) अशी दोघींची नावे असून त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हा धक्ककादायक प्रकार सोमवारी पहाटे घडला. हल्लेखोर फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

## सुधारगृहातून बारा महिला पसार

। ठाणे । प्रतिनिधी ।

उल्हासनगर येथे ठाणे जिल्हा महिला बालविकास विभागाच्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्या महिला सुधारगृहातून १२ महिलांनी पळ काढल्याची धक्कादायक घटना घडली आहे. उल्हासनगर पोलिसांना याची माहिती मिळताच पोलिसांनी यातील ७ महिलांना शोधून काढले. तर पाच महिलांचा अजूनही शोध लागलेला नाही. याप्रकरणी हिल लाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ठाणे जिल्ह्यातील विविध पोलीस ठाणेअंतर्गत पीटा कायद्यानुसार कारवाई केल्यानंतर या महिलांना उल्हासनगरच्या या शासकीय महिला सुधारगृहात आणून ठेवण्यात आले होते. यातील काही महिलांनी रविवारी रात्रीच्या सुमारास अंधाराचा फायदा घेऊन भिंतीवरून उडी मारून तर काही महिलांनी मुख्य प्रवेशद्वारावरून उडी मारून पळ काढला. उल्हासनगर पोलिसांना याची माहिती मिळताच पोलिसांनी यातील ७ महिलांना शोधून काढले. तर पाच महिलांचा अजूनही शोध लागलेला नाही. मागील महिन्यात याच परिसरातील मुलींच्या वसतिगृहातून ८ मुलींनी पळ काढला होता. यामुळे उल्हासनगर येथील मुलींचे आणि महिलांच्या वसतीगृहाच्या सुरक्षेतील त्रुटी पुन्हा एकदा उघड झाल्या आहेत.

## विद्यार्थिनीची आत्महत्या

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील ऐरोली परिसरातील शाळेत दहावीत शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीने आत्महत्या केली आहे. मृत मुलीच्या वडिलांनी शाळेच्या मुख्याध्यापिकेवर गंभीर आरोप केले आहेत. या प्रकरणी मृत मुलीच्या वडिलांनी तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी मुख्याध्यापिकेवर गुन्हा दाखल केला. पालकांनी केलेल्या तक्रारीनुसार, अनुष्काची दहावीची परीक्षा सुरू असताना तिच्या बेंचखाली कॉपी सापडली. त्यानंतर मुख्याध्यापिका कविता देशमुख यांनी तिचा सर्वांसमोर अपमान केला. तिच्याबद्दल अपशब्द वापरले. या घटनेमुळे ती मानसिक तणावाखाली होती. तिनं मुख्याध्यापिकेच्या अपमानामुळेच हे टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप पीडित मुलीच्या वडिलांनी केला आहे.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक बारतुला वी जे के शर्मा यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे बलीवरे तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ३५/८ | एकुण क्षेत्र १-४६-०० हे आर पॉ या पैकी क्षेत्र ०-७३-०० हे आर पॉ एवढे क्षेत्र | १-२० |
| ३५/२/अ/२ | एकुण क्षेत्र २ - ५६ -०० हे आर पॉ या पैकी क्षेत्र १-२८-०० हे आर पॉ एवढे क्षेत्र | १-९६ |
| ३५/२/अ/३ | एकुण क्षेत्र १-२५-०० हे आर पॉ या पैकी क्षेत्र ०-६१-५० हे आर पॉ एवढे क्षेत्र | ०-९५ |
| ३५/२/अ/४ | एकुण क्षेत्र १-३२-०० हे आर पॉ या पैकी क्षेत्र ०-६६-०० हे आर पॉ एवढे क्षेत्र | १-०६ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक ०७/१०/२०२५

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर अमराई रोड, कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा.९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९. तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर, अमराई रोड. कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

**PUBLIC NOTICE**

NOTICE IS HEREBY GIVEN to all concerned that, we, on behalf of our client, are investigating the ownership right, title and interest of (i) Vidyadhar Balaram Patil, (ii) Hareshwar Balaram Patil, (iii) Saroj Ramchandra Vartak, (iv) Asha Jairam Patil, (v) Pratibha Kamlakar Mhatre and (vi) Dayanand Narayan Patil, in respect of all that piece and parcel of agricultural land bearing Gat No. 153 admeasuring 00-47-00 (Hectare-Ares-Square Meters) equivalent to 4,700 square meters, situate, lying and being at Village Pedhambe, Taluka Alibaug and District Raigad and more particularly described in the Schedule hereunder written (hereinafter referred to as the "Property").

Any person/ entities having or claiming to have any share, right, title, interest, claim, objection and/ or demand (directly or indirectly) whether by way of sale, memorandum of understanding, transfer, assignment, exchange, allotment, charge, encumbrance, tenancy, sub-tenancy, lease, sub-lease, license, mortgage (equitable or otherwise), inheritance, occupation, possession, partition, share, gift, devise, lien, charge, outgoings, development rights, maintenance, easement, trust, covenant or condition, easement, release, relinquishment or any other method through any agreement, contract, deed, document, writing, conveyance deed, devise, bequest, succession, family arrangement/ settlement, litigation, decree or order or award of any court of law or tribunal or revenue or statutory authority or arbitration or otherwise howsoever of any nature whatsoever, in to, out of or upon the Property or any part thereof are hereby required to give notice thereof in writing along with complete and certified true copies of documentary evidence/ proof thereof, to the undersigned, at One World Centre, 7thFloor, Tower 2A, Senapati Bapat Marg, Lower Parel (West), Mumbai – 400 013 and also by e-mail to monika.bhonsale@trilegal.com and uday.shah@trilegal.com, within **14(fourteen) days** from the date hereof, failing which, claim/s, if any, of such person, shall be deemed to have been waived and/ or abandoned and not binding in any manner whatsoever.

**SCHEDULE**
**(Description of the Property)**

All piece and parcel of agricultural land bearing Gat No. 153(corresponding to old Gat No. 160 and old Survey No. 85/1) admeasuring 00-47-00 (Hectare-Ares-Square Meters) equivalent to 4,700square meters,situate, lying and being at Village Pedhambe, Taluka Alibaug and District Raigad and bounded as follows:-

On or towards the North : Lands bearing Gat Nos. 152 and 232;
On or towards the South : Passage for water (Naala);
On or towards the East : Land bearing Gat No. 154; and
On or towards the West : Land bearing Gat No. 144.

Dated this ____day of October, 2025

Monika Bhonsale
Partner Trilegal
Advocates and Solicitors
One World Centre,
7thFloor, Tower 2A,
Senapati Bapat Marg,
Lower Parel (West),
Mumbai - 400 013

## पोलीस ठाण्यात रक्तदान शिबीर

। खोपोली । प्रतिनिधी ।

खोपोली पोलीस स्टेशनच्या आवारात सोमवारी (दि.६) रक्तदान शिबिर आणि स्वच्छ भारत अभियान मोठ्या उत्साहात पार पडले. लायन्स क्लब ऑफ खोपोली, खोपोली पोलीस स्टेशन, महामार्ग वाहतूक पोलीस मदत केंद्र बोरघाट आणि हेल्प फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने समर्पण ब्लड बँक यांच्या सहकार्याने हे शिबीर घेण्यात आले.

या उपक्रमाचे उद्घाटन लायन्स क्लब ऑफ खोपोलीचे अध्यक्ष लायन अविनाश राऊत, खोपोली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे, महामार्ग वाहतूक पोलीस मदत केंद्र बोरघाटचे पोलीस निरीक्षक स्वप्निल पाटील आणि हेल्प फाउंडेशनचे अध्यक्ष गुरुनाथ साठेलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

या रक्तदान शिबिरात लायन्स क्लब ऑफ खोपोलीचे पदाधिकारी, खोपोली पोलीस स्टेशन आणि महामार्ग वाहतूक पोलीस मदत केंद्र बोरघाटचे अधिकारी व कर्मचारी तसेच हेल्प फाउंडेशनचे सदस्य यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडली. रक्त संकलनाची जबाबदारी समर्पण ब्लड बँक यांनी यशस्वीरित्या सांभाळली.

रक्तदानासोबतच परिसर स्वच्छतेचा संदेश देत स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छता उपक्रमही राबविण्यात आला. समाजहिताच्या या दुहेरी उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या शिबिराची विशेष चर्चा होती.

**महाराष्ट्र शासन**
**जिल्हाधिकारी कार्यालय रायगड अलिबाग**

जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिनस्त उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसिलदार कार्यालय मध्ये अभिलेख कक्षात कॉम्पॅक्टर बसवणे कामी GST नोंदणीकृत तसेच शॉप ॲक्ट लायसन्स मान्यता प्राप्त उत्पादक/ पुरवठादारा कडून ऑनलाईन प्रणालीद्वारे दराबाबत ई-निविदा मागविण्यात येत आहेत.
टिप - या निवेदिवरील संपूर्ण माहिती : https://mahatenders.gov या संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | ई-निविदा सादर करणेचा कालावधी | दि. ०३/१०/२०२५ स. ११.०० वा पासून ते दि. १७/१०/२०२५ स. ०५.०० वा पर्यंत |
| २ | ई-निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि. १७/१०/२०२५ स. ०५.०० वा पर्यंत |
| ३ | प्री- बीड बैठक | दि. ०७/१०/२०२५ स. ११.०० वा |
| ४ | अभिलेख कक्षासाठी Site Survey करण्याचा कालावधी | दि.०३/१०/२०२५ स. ११.०० वा पासून ते दि. १३/१०/२०२५ स. ११.०० वा पर्यंत |
| ५ | ई-निविदा उघडण्याचे ठिकाण दिनांक व वेळ | जिल्हाधिकारी कार्यालय रायगड दि. २४/१०/२०२५ रोजी स. १२.३० वा |

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हाधिकरी रायगड यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

सही/-
**(किशन ना.जावळे)**
**जिल्हाधिकारी कार्यालय रायगड**

**विमाका/कोवि/२०२५-२०२६/११५**

**पनवेल महानगरपालिका**
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | M/s. Life good I-Smart Homes Private Limited, Swastik 11, Plot No-7 &7A, Sector-11, Kharghar-410210 | ०१ जांभूळ झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील स्वस्तिक ११, प्लॉट नं. ७ व ७ A सेक्टर-११, खारघर, नवी मुंबई येथे भूखंडाच्या आवारातील ०१ जांभूळ झाड नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहे. |
| २. | मे. आकार इलाइट, प्लॉट नं. १८A, सेक्टर-२१ खारघर, ता. पनवेल, जि. रायगड | ०३ सप्तपर्णी व ०१ जंगली अशी एकूण ०४ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं. १८A,सेक्टर-२१ खारघर ता. पनवेल, जि. रायगड येथील ०३ सप्तपर्णी व ०१ जंगली अशी एकूण ०४ झाडे हे इमारतीत वाहने पार्किंग व अग्निशमन वाहन आत बाहेर करणेस बाधित/अडथळा निर्माण करीत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मूदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
उपायुक्त
तथा वृक्ष अधिकारी
पनवेल महानगरपालिका

PMC-PARK/585/2025-PTAD

ॲड. महेश म. गुंजाळ
नि. १४/ड

**पेपर नोटीस**

मा. हंगरमेकर साहेब यांचे कोर्टात
**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश व स्तर यांचे न्यायालयात**
रे.मु.क्र. ८/२०२३

श्री. जुनेद नसरूद्दीन मेस्त्री ... वादी
विरुद्ध
श्री. नुसरात उर्फ हुमेरा मेस्त्री ... प्रतिवादी

प्रति,
प्रतिवादी क्र. १) श्री. नुसरात उर्फ हुमेरा मेस्त्री
रा. मुस्लीम नाका, दादुभाई स्वीटसच्या पाठीमागे घर नं. १८५/अ, महात्मा गांधी मार्ग पनवेल ता. पनवेल, जि. रायगड- ४१०२०६

ज्याअर्थी, वादी यांनी तुमच्या विरूद्ध न्यायालयात वाद दाखल केला आहे. म्हणून सदर दात्याच्या संबंधात आपले म्हणणे मांडण्यासाठी दिनांक १०/११/२५ रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात आपण जातीने किंवा ज्यास यथायोग्य सूचना दिलेल्या असून जो वादा संबंधीच्या सर्व महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशा किंवा सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशा व्यक्ती त्यांच्याबरोबर असेल अशा वकीलांमार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलावण्यात येत आहे व तुमच्या हजेरीसाठी ठरवलेला दिवस वादाच्या अंतिम निर्णयासाठी नेमलेला दिवस असल्यामुळे तुमच्या बचावाच्या पुष्ठ्यर्थ तुम्ही ज्या साक्षीदाराच्या साक्षीचा व ज्या दस्तऐवजाचा आधार घेऊ इच्छिता ते सर्व साक्षीदार व सर्व दस्तऐवज त्या त्या दिवस हजर करण्याची तुम्हाला तयारी ठेवावी लागेल.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, उपरोक्त दिवशी हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत वादाची सुनावणी होऊन निर्णय दिला जाईल याची दखल घ्यावी.

आज दिनांक १/१०/२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क. लिपिक**
**दि.न्या.व स्तर पनवेल**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर पनवेल**

## चैताली म्हात्रे, रितेश मोकल यांना पुरस्कार

। उरण । प्रतिनिधी।

उरण पाले येथील मराठी प्राथमिक शाळेच्या शिक्षिका चैताली किरण म्हात्रे यांना जिल्हास्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच, उरण तालुक्यातील रितेश रमेश मोकल यांनाही आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार वितरण सोहळा रोहा येथे नुकताच पार पडला. पुरस्कार मिळाल्याबद्दल दोघांचेही सर्व स्तरांमधून अभिनंदन करण्यात येत आले. यावेळी चैताली म्हात्रे यांनी प्रत्येकांनी आई वडिलांचे संस्कार, शिक्षणाची कास, जिद्द आत्मसात केले, तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही, असे सांगितले.

# निवडक



## शिक्षकांच्या बदलीमुळे विद्यार्थी भावुक

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील हेदवली या रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षकांची बदली झाली. यात प्रशाकीय बदली झालेले माजी मुख्याध्यापक किसन दरवडा, शिक्षक बाळाराम गायकर, विषय शिक्षक शांताराम पवार आणि सहशिक्षक भरत ढाकणे यांची बदली झाली. या शिक्षकांच्या मोठ्या योगदानामुळे हेदवली जिल्हा परिषद शाळेला मुख्यामानतरी सुंदर शाळा स्पर्धेत राज्यात दुसरा क्रमांक मिळाला होता. या सर्व शिक्षकांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शालेय व्यवस्थापन समिती आणि ग्रामस्थ यांच्या वतीने निरोप समारंभाचे आयोजन केले होते. या सर्व शिक्षकांचा स्वागत सत्कार ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला. यावेळी या शिक्षकांना निरोप देण्यासाठी झालेल्या कार्यक्रमात शाळेचे विद्यार्थी भावुक झाले होते.



## शिवणसई शाळेला संगणक, प्रिंटर भेट

**पनवेल :** ग्रामपंचायत सदस्य विश्वास पाटील यांच्या शब्दरूपी पाठपुराव्याला यश आले असून शिवणसई राजिप शाळेला दोन संगणक आणि दोन प्रिंटर भेट म्हणून मिळाले आहेत. कीर्ती महाविद्यालय दादर मुंबई यांच्या माध्यमातून शाळेतील विद्यार्थ्यांसाठी संगणक आणि प्रिंटर भेट म्हणून देण्यात आले आहेत. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक डॉक्टर अनिल मार्कंडेय, दत्तात्रय पाटील, अंकुश दळवी, मंदार खानविलकर, नभेश पांचाळ, निमेश कुंडे यांच्यासह रायगड जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका प्रतिभा नाईकवडे, सुवर्णा कांबळे, उज्वला पाटील उपस्थित होते.



## विजय सावंत यांचे स्वयंसेवकांना मार्गदर्शन

**आगरदांडा :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आज जीवनाच्या सर्व पैलूंना स्पर्श करताना दिसतो आहे. हे सर्व काम हिंदू समाजाचे संघटन करण्यासाठी आहे. त्यामुळे मुळ देश साध्य करण्यासाठी मनुष्य निर्माण करण्यावर संघाचा प्रयत्न आहे. पंच परिवर्तन सुत्रांच्या आधारे समाजात आमुलाग्र बदल घडविण्यासाठी सज्जन शक्तींनी पुढे यावे, असे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे रायगड विभाग कार्यवाह विजय सावंत यांनी केले. मुरुड तालुका राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी वर्षानिमित्य आयोजित एका जाहीर कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. तसेच, आपल्या भाषणात त्यांनी समरसता गतविधी, कुटुंब प्रबोधन, स्व जागरण, नागरी कर्तव्य आणि पर्यावरण संवर्धन या पंचसुत्रीवर अत्यंत अभ्यासपूर्ण विवेचन करून समाजात अकारण पसरविल्या जाणाऱ्या विमर्श (नॅरेटिव्ह) कडे सावधपणे लक्ष देऊन कृती केली पाहिजे, असे आवाहन केले.




## खासगी सावकारांविरोधात निषेध मोर्चा


**ठाणे :** बेकायदेशीर पद्धतीने खासगी सावकार आणि वित्तीय संस्था यांच्या जाचक वसुली आणि अटीच्या विरोधात ठाणे शहरात सोमवारी (दि.६) आंदोलन करण्यात आले. ठाणे रेल्वे स्थानकजवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून ते गावदेवी येथील जिल्हा उपनिबंधक कार्यालयापर्यंत निषेध मोर्चा काढण्यात आला होता. 'सहकारातून मदत द्या, सावकारीतून मुक्तता करा', 'सावकारीमुक्त समाज आमचा निर्धार' अशा मजकुराचे फलक आंदोलनकर्त्यांनी हातात घेतले होते. हे आंदोलन महाराष्ट्र लोकाधिकार समितीचे प्रदेशाध्यक्ष प्रसाद करंदीकर यांच्या नेत्तृत्वाखाली करण्यात आले. यावेळी त्यांनी उपस्थित जनसमुदायाला मार्गदर्शन करत कर्जदार आणि सावकारांच्या अन्यायकारक वागणुकीविरोधात आवाज उठवला. त्यानंतर उपनिबंधक किशोर मांडे यांना निवेदन देण्यात आले. मांडे यांनी मागण्यांवर सहानुभूतीपूर्वक विचार करून न्याय नक्की मिळेल, असे आश्वासन दिले.



## पथनाट्यातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**पाताळगंगा :** रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव येथील विद्यार्थ्यांना आभ्यासाची गोडी समवेत वाचन संस्कृती जोपासली जावी या उद्दात विचारांतून अल्काईल अमाईन्सच्या सीएसआर फंडातून तसेच क्वेस्ट संस्थेच्या माध्यमातून पथनाट्य हा कार्यक्रम हाती घेण्यात आला. शालेय शिक्षण घेत असताना वाचनास खूप महत्व असून या माध्यमातून आपणास खूप ज्ञान मिळत असते. मात्र हे पथनाट्याच्या स्वरुपात दाखविल्यास त्याचे महत्व विद्यार्थ्यांस कळेल आणि वाचन करण्यास प्राधान्य देतील. हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून संतोष शेटे, महेश वाळुंज, नूतन खानविलकर, पुजा दळवी यांच्या गटाने गोष्टरंग पथनाट्य सादर केले. पुस्तक न वाचणारी विद्यार्थी या पथनाट्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचन प्रेरणा देऊन वाचनाचे महत्त्व समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेत त्यातील पत्र, वाचन घटक समजून घेतले.

# औद्योगिक कामगार आणि मानसिक आरोग्य काळाची गरज



**श्री. प्रदीप नाईक**

**अध्यक्ष, लायन्स क्लब अलिबाग.**






१० ऑक्टोबर हा जागतिक मानसिक आरोग्य दिन म्हणून जगभर साजरा केला जातो.मानसिक आरोग्य हा काय प्रकार आहे हेच अनेकाना अजून माहीत नाही. मानसिक आरोग्य, मानसिक स्वास्थ्य ही जागतिक पातळीवरील सर्वात मोठी समस्या बनू पाहत आहे. एका अधिकृत सर्व्हे नुसार २०३० सालापर्यंत हा जगातील एक नंबरचा आजार ठरणार आहे. त्यासाठी या विषयाबाबत जागृतता निर्माण करणे, लोकांचे मनातील या विषयाबाबतची भिती दूर करणे फार जरुरीचे आहे. भारतामध्ये सुद्धा मानसिक आरोग्य हा विषय गंभीर स्वरूप धारण करीत आहे, खरे म्हणजे भारतीय संस्कृती, एकत्र कुटुंब पद्धतीमुळे जरी यासाठी थोडे सकारात्मक वातावरण आपल्याकडे असले तरी जागतिक पातळीवरील जीवघेणी स्पर्धा, वाढती बेकारी, व्यायामाचा अभाव, वाढती लोकसंख्या, धावपळीचे आणि आधुनिक राहणीमानाचे नावाखाली योगसाधनेकडील दुर्लक्ष अशा अनेक कारणामुळे तरुण, महिला, वरिष्ठ नागरिक, औद्योगिक कामगार या सर्वच पातळीवर मानसिक स्वास्थ्य समस्या गंभीर स्वरूप धारण करीत आहे.या विषयावर उपाययोजना करण्यासाठी उपलब्ध असणारी अत्यल्प वैद्यकीय तज्ञ सेवा या सर्वांमुळे हा प्रश्न अधिक गंभीर बनत आहे. औद्योगिक क्षेत्र ही या समस्येपासून दूर राहिलेले नाही.

औद्योगिक क्षेत्राचा विचार केला तर एका अधिकृत माध्यमातून केलेल्या सर्वे नुसार ७६ टक्के कर्मचाऱ्यांनी मानसिक स्वास्थ्य समस्येमुळे त्यांचे कामावर नकारात्मक परीणाम होत असल्याचे मान्य केले आहे. परंतु त्यापैकी ५० टक्के लोकांना याबाबत चिंता वाटते, यासर्वामुळे उत्पादकतेवर फार मोठा परिणाम होत असतो, आणि पर्यायाने देशाचे फार मोठे नुकसान होत असते. हा प्रश्न अजून जेवढा गांभीर्याने घेतला पाहिजे तेवढा व्यवस्थापनाकडूनही घेतला जात नाही, सरकार ही या समस्येकडे पाहिजे तेवढे लक्ष देत नाही. हा प्रश्न असाच दुर्लक्षित राहिला तर भविष्यात उत्पादकतेवर लक्षणीय परिणाम होईलच पण त्यापेक्षा कामगार वर्गाला आणि त्यांचे कुटुंबियांनाफार मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागेल. याकरीतच वेळीच जागृतता, उपाययोजना, मार्गदर्शन, प्रशिक्षण अशा विविध माध्यमातून व्यवस्थापन आणि सरकारने तसेच समाज-सेवी संघटनांनी तातडीने पावले उचलण्याची गरज आहे. यासाठी कामाच्या ठिकाणी काम करताना उत्साहवर्धक वातावरण कसे राहील, याची काळजी व्यवस्थापने घेणे आवश्यक आहे.

कामगाराला कामातून आनंद मिळाला पाहिजे, ज्यायोगे त्याचा मानसिक तन आपोआपच कमी होईल, यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण देण्याची गरज असते.

औद्योगिक क्षेत्रात ताण-तणाव निर्माण होण्याची किंवा मानसिक स्वास्थ बिघडण्याची अनेक कारणे आहेत, त्यातील सर्वात महत्त्वाचं कारण म्हणजे बाजारातील स्पर्धेमुळे व्यवस्थापनाकडून सतत मोठ्या प्रमाणावर उत्पादन वाढीकरता निर्माण केला जाणारा अतिरिक्त कामाचा दबाव, अपुरी साधनसामग्री असताना सुद्धा कर्मचाऱ्यांकडून अधिकाधिक उत्पादनाची अपेक्षा करताना त्यांना आवश्यक त्या सुविधा न पुरवणे, सुरक्षिततेची साधने न पुरवणे हे या मागचं प्रमुख कारण आहे. यामुळे कामगारांच्या मनामध्ये फार मोठी असुरक्षितता निर्माण होत असते. त्यांचे मनावर सतत तणाव असतो. कामाचे प्रमाणात मिळणारे वेतनमनही अपुरे असते, त्यामुळे कौटुंबिक असंतोष असतोच.

त्याचप्रमाणे जेवढं कुशल व्यवस्थापन आवश्यक आहे ते सुद्धा अपुरे प्रमाणात असल्याकारणाने मानसिक ताणतणाव वाढण्यास कारणीभूत ठरत असतो. यापलीकडे जाऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्या सेवा सुविधा किंवा सुरक्षिततेची काळजी घेतली जाते तेवढी काळजी अजूनही आपल्या देशामध्ये घेतली जात नाही. नोकरीमधली असुरक्षितता हे सुद्धा यामागचे एक प्रमुख कारण आहे. आज काम करत असताना कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड प्रमाणात असुरक्षिततेची भावना असते, वाढती बेकारी तसेच बाजारामध्ये उपलब्ध असलेले मोठ्या प्रमाणातले मनुष्यबळ याचा विपरीत परिणाम कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मानसिकतेवर होत असतो. या सर्वाकडे लक्ष देण्यासाठी कर्मचाऱ्यांना जे आवश्यक प्रशिक्षण देणे आवश्यक आहे, त्यांचे मानसिक मनोबल कसे वाढेल आणि कामाचे ठिकाणी सकारात्मक परिस्थिती कशाप्रकारे निर्माण होईल हे पाहणे गरजेचे असते परंतु त्याकडे आपल्या देशामध्ये जेवढ्या प्रमाणात लक्ष दिले पाहिजे तेवढे दिले जात नाही. विशेष करून लघुउद्योग आणि मध्यम स्वरूपाच्या उद्योगांमध्ये या सर्वांचे प्रमाण हे फार जास्त आहे. यासाठी अनेक उपाययोजना करता येण्यासारख्या आहेत. विशेष म्हणजे कर्मचाऱ्यांकरता अनेक कल्याणकारी योजना राबवण्याची निश्चितच गरज आहे. त्यामध्ये कर्मचाऱ्यांना स्वतःचे घर घेण्यासाठी कारखान्याच्या वतीने कमी व्याज दारावर कर्ज उपलब्ध करून देणे, सुरक्षिततेबाबत योग्य ते प्रशिक्षण देणे, आवश्यक ती सुरक्षा साधने उपलब्ध करून देणे, त्याचप्रमाणे कामाचे तास नियंत्रित करणे तसेच कारण नसताना कर्मचाऱ्यांना आठ तासापेक्षा जास्त तास काम करावे लागणार नाही याकडे लक्ष देणे, त्याचप्रमाणे मानसिक स्वास्थ्यासाठी विविध प्रकारच्या उपाययोजना, प्रशिक्षण आणि मनोबल उंचावणारे कार्यक्रम राबविणे याची नितांत गरज आहे. व्यवस्थापनाकडून मिळणार प्रोत्साहन ही यामध्ये फार महत्त्वाची बाब आहे. जे कर्मचारी उत्तम काम करतात त्यांचा सन्मान करणे, त्यांना प्रमोशन देणे त्यांना आर्थिक लाभ देणे, त्याचप्रमाणे समाजामध्ये त्यांना प्रतिष्ठेची वागणूक देणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

शेवटी हे सर्व केल्याने या सर्वाचा मुख्य फायदा हा व्यवस्थापनालाच होणार आहे. कर्मचाऱ्यांचे उत्तम मानसिक स्वास्थ थेटपणे कारखान्याच्या उत्पादनक्षमता, नफा क्षमता वाढवीत असते. कारखान्याच्या आणि आपल्या देशाच्या उत्पादकतेवर त्याचा फार मोठा सकारात्मक परिणाम होत असतो. याच दृष्टीने याचे महत्त्व लक्षामध्ये येऊन व्यवस्थापनाने आपल्या कर्मचाऱ्यांचे मानसिक स्वास्थ्य कसे उच्च पातळीवर राहील याकरता निश्चितच प्रथम प्राधान्य दिले पाहिजे. कर्मचाऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या समजून घेणे, त्यांना व्यवस्थापकीय सहाय्य करणे नितांत गरजेचे आहे. यामुळे वाढीव उत्पादकता, वाढीव नफा कर्मचाऱ्यांचे राहणीमान उंचावणार आहे. पर्यायाने त्यांची सकारात्मकता कर्मचाऱ्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर सकारात्मक परिणाम करेल. उत्तम मानसिक स्वास्थ्य प्रकृती उत्तम ठेवते, गैरहजेरी कमी करते. पर्यायाने वैद्यकीय खर्चावर सुद्धा नियंत्रण येते. कारखान्यांमध्ये एक प्रकारचे सकारात्मक वर्क कल्चर निर्माण होते, या सर्वातून एकच गोष्ट आपण लक्षामध्ये घेतली पाहिजे ती म्हणजे आज औद्योगिक क्षेत्रामध्ये जे सुरवातीला सांगितल्याप्रमाणे ७० टक्के पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांना आपल्या मानसिक स्वास्थ्याचा आपल्या उत्पादकतेवर नकारात्मक परिणाम होतो असे वाटते की संख्या कमी होऊन या समस्येवर योग्य वेळी योग्य उपाय योजना करता येईल. कर्मचाऱ्यांचे आयुष्यमान वाढेल, निवृत्तीनंतरसुद्धा त्यांचे जीवन आनंदी राहील. लायन्स इंटरनॅशनलने हेच ओळखून या विषयाला प्राधान्य दिले आहे, सर्वच सेवाभावी संस्थानी याकामी पुढाकार घेणे आता काळाची गरज आहे.

## निवडक

### बर्नार्ड ज्युलियन निधन



**नवी दिल्ली :** वेस्ट इंडिजचा महान खेळाडू १९७५ चा एकदिवसीय विश्वचषक जिंकण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे बर्नार्ड ज्युलियन यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले. बर्नार्ड यांनी वेस्ट इंडिजसाठी बॅट आणि बॉल दोन्हीने महत्त्वाची भूमिका बजा-वली आणि संघाला पहिला एकदिवसीय विश्वचषक इतक्या सहजतेने जिंकण्यास मदत केली, त्यांचा विक्रम प्रभावी आहे. बर्नार्ड ज्युलियनने वेस्ट इंडिजसाठी २४ कसोटी आणि १२ एकदिवसीय सामने खेळले. कसोटी क्रिकेटमध्ये त्याने ३०.९२ च्या सरासरीने ८६६ धावा केल्या आणि ३७.३६ च्या सरासरीने ५० बळी घेतले. एकदिवसीय क्रिकेटमध्ये ज्युलियनने २५. ७२ च्या सरासरीने एकूण १८ बळी घेतले. डावखुरा स्विंग गोलंदाज म्हणून तो संघाचा एक महत्त्वाचा भाग होता, त्याने बॅट आणि बॉल दोन्हीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. १९७५ च्या विश्वचषकात ज्युलियनने श्रीलंकेविरुद्ध २० धावा देत ४ बळी आणि न्यूझीलंडविरुद्ध २७ धावा देत ४ बळी घेतले.

### ऑस्ट्रेलियाची न्युझीलंडवर मात





**माऊंट मौंगानुई :** ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मिचेल मार्श याने आपले पहिले टी-२० आंतरराष्ट्रीय शतक झळकावले. त्याच्या या शतकी खेळीच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने तिसर्या सामन्यात न्यूझीलंडवर तीन गडी राखून विजय मिळवत चॅपेल-हॅडली मालिका २-० अशी जिंकली. ५० चेंडूंत शतक पूर्ण करणाऱ्या मिचेल मार्शने ऑस्ट्रेलियाच्या डावाला सुरुवातीपासून शेवटपर्यंत सांभाळले. मधल्या षटकांमध्ये संघाने एकापाठोपाठ विकेट गमावल्यानंतरही मार्शने संघाला विजय मिळवून दिला. न्यूझीलंडने दिलेले १५७ धावांचे लक्ष्य ऑस्ट्रेलियाने दोन षटके बाकी असताना ७ गड्यांच्या मोबदल्यात १६० धावा करून पूर्ण केले. मार्श १०३ धावांवर नाबाद राहिला. ऑस्ट्रेलियाच्या एकूण धावसंख्येपैकी ६० टक्क्यांहून अधिक धावा त्याने एकट्याने केल्या. बुधवारच्या पहिल्या सामन्यातही मार्शने ४३ चेंडूंत ८५ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली होती. शुक्रवारचा दुसरा सामना पावसामुळे रद्द झाला होता. दरम्यान, या तिसऱ्या सामन्यात नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडचा संघ ५० षटकांत ९ बाद १५६ धावसंख्येपर्यंत मजल मारू शकला. सलामीवीर टिम सायफर्टने सर्वाधिक ३५ चेंडूंत ४८ धावा केल्या.

### जिल्हास्तरीय शालेय योगासन स्पर्धा

**म्हसळा :** जिल्हास्तरीय शालेय योगासन स्पर्धेचे आयोजन म्हसळा तालुक्यातील मेंदडी येथे अठरागाव आगरी समाज सामाजिक सभागृहात उत्साहात पार पडले. या स्पर्धेत जिल्हाभरातील विविध शाळांतील १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेत योगासने, शरीरसौष्ठव व मानसिक एकाग्रतेचा अद्वितीय संगम पाहायला मिळाला. स्पर्धेच्या उद्घाटन महादेव पाटील याच्या उपस्थितीत झाले. स्पर्धेचे पंच म्हणून उत्तम मांदारे, संतोष महाडिक, मानसी मांदारे, सागर शितकर, चैताली पाटील, विशाखा गौतडे, निशा पाटील, दिव्या खोत, भाविक खोत, यामिनी दिघे, सुरज पाटील, प्रशांत देशमुख यांनी बहुमोल सहकार्य केले.

# भारताने पाकिस्तानला लोळवले

## सलग बारा वेळा उडवला धुव्वा | विश्वचषकात पाचव्यांदा चारली धूळ




**। कोलंबो । वृत्तसंस्था ।**

आयसीसी महिला विश्वचषकातील सहावा सामना भारत आणि पाकिस्तान महिला क्रिकेट संघामध्ये येथील आर प्रेमदासा स्टेडियमवर खेळवण्यात आला. या सामन्यात भारताच्या महिला ब्रिगेडने निर्विवाद वर्चस्व राखत ८८ धावांनी विजय मिळवला. यासह भारतीय संघाने स्पर्धेतील सलग दुसरा विजय मिळवला असून पाकिस्तानला मात्र दुसऱ्याही सामन्यात पराभवाला सामोरं जावे लागले आहे. विशेष म्हणजे भारतीय महिला संघाने पाकिस्तानचा बाराव्यांदा वनडे क्रिकेटमध्ये पराभव केला आहे. पाकिस्तानला भारताविरुद्ध अद्यापही वनडे सामना जिंकता आलेला नाही.

या सामन्यात पाकिस्तानची कर्णधार फातिमा सनाने नाणेफेक जिंकून भारतीय संघाला प्रथम फलंदाजीचा आमंत्रण दिले. यानंतर भारतीय महिला संघाने मिळालेल्या संधीचा फायदा घेत निर्धारित ५० षटकात सर्वबाद २४७ धावा केल्या. यादरम्यान भारतीय संघाच्या एकाही फलंदाजांने अर्धशतकी खेळी केली नसली तरी सर्व फलंदाजांनी उपयुक्त खेळी केली. संघाकडून हरलीन देओलने सर्वाधिक ४६ धावा केल्या. तर ऋचा घोष (३५), जेमिमा रॉड्रिग्स (३२) प्रतिका रावल (३१) यांनीही छोटेखानी खेळी केली. तर गोलंदाजी पाकिस्तान कडून डीयाना बेगने सर्वाधिक ४ तर सादिया इकबाल आणि फातिमा सना यांनी प्रत्येकी दोन-दोन विकेट घेतल्या.

भारतीय संघाने दिलेल्या २४८ धावांचे लक्ष घेऊन मैदानात उतरलेल्या पाकिस्तानच्या फलंदाजांनी निराशजनक कामगिरी केली. परिणामी संघाचा डाव ४३ षटकात १६९ धावांवर संपुष्टात आला. संघाकडून सिदारा अमिन हिनं सर्वाधिक ८१ धावा केल्या, मात्र उर्वरित फलंदाजांनी तिला साथ दिली नाही. हिच्या व्यतिरिक्त नतालिया परवेझ (३३) आणि सिदरा नवाज (१४) यांनाच दुहेरी आकडा गाठता आला. गोलंदाजी भारताकडून क्रांती गौंड आणि दीप्ती शर्मा यांनी प्रत्येकी ३ विकेट घेतल्या तर स्नेह राणानंही दोन विकेट घेतल्या.

### हस्तांदोलन करणं टाळलं

**कोलंबोच्या आर. प्रेमदासा स्टेडियमवर, विश्वचषकाच्या सहाव्या सामन्यात भारत आणि पाकिस्तान आमनेसामने आले. टॉस दरम्यान भारतीय कर्णधार हरमनप्रीत आणि पाकिस्तानी कर्णधार फातिमा हस्तांदोलन करतील का याकडे सर्वांचे लक्ष होते. कर्णधारांनी हातमिळवणी केली नाही.**

यासह भारतीय महिला संघाने वनडे विश्वचषकात सर्व पाच सामन्यांमध्ये पाकिस्तानला हरवलं आहे. केवळ विश्वचषकच नाही तर भारत आणि पाकिस्तानमध्ये आतापर्यंत एकूण १२ वनडे सामने खेळले गेले आहेत आणि भारतीय महिला संघानं ते सर्व सामने जिंकले आहेत.

# हरजस सिंगचे त्रिशतक




**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू हरजस सिंगनं न्यू साउथ वेल्स प्रीमियर क्रिकेट स्पर्धेत खळबळ उडवून दिली. हरजसच्या स्फोटक फलंदाजीमुळे त्याने ५० षटकांच्या सामन्यात त्रिशतक केले. त्यानं फलंदाजी करताना १४१ चेंडूंचा सामना केला आणि एकूण ३५ षटकार मारले. हरजसने शनिवारी सिडनीविरुद्धच्या वेस्टर्न सबर्ब्स सामन्याच्या दुसऱ्या फेरीत ही ऐतिहासिक कामगिरी केली.

तिसऱ्या क्रमांकावर २० वर्षीय हरजस सिंग फलंदाजीला आला. पहिल्या काही चेंडूंवर स्थिरावल्यानंतर हरजसनं चौकार आणि षटकारांचा वर्षाव केला. हरजसनं प्रथम ३३ चेंडूत अर्धशतक पूर्ण केलं. अर्धशतक पूर्ण केल्यानंतर तो काही काळ मंदावला, परंतु नंतर ७४ चेंडूत शतक पूर्ण केल्यानंतर जणू काही त्यानं मैदानात चौकार-षटकारांचा पाऊसच पाडला. ३५ षटकार आणि १२ चौकारांसह विक्रमी खेळी : हरजस सिंगनं ३१४ धावांच्या खेळीत ३५ षटकार आणि १२ चौकार मारले. परिणामी त्यानं केवळ षटकार-चौकारांच्या मदतीनं २५२ धावा केल्या. हरजसची स्फोटक फलंदाजीचा अंदाज त्याच्या दुसऱ्या शतकावरुन काढता येतो ७४ चेंडूत शतक केल्यानंतर त्याचं तिसरं शतक १३२ चेंडूत झालं. तो शेवटच्या षटकात ३१४ धावांवर बाद झाला. अशाप्रकारे, हरजसच्या स्फोटक फलंदाजीमुळं वेस्टर्न सबर्ब्सनं ५० षटकांत ५ बाद ४८३ धावांची मोठी धावसंख्या उभारली.

# पाकिस्तानी खेळाडूंना मोठी शिक्षा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आशिया चषकात भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यातील सामन्याकडे यंदाही जगाचे लक्ष लागले होते. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढला होता, भारताने एअर स्ट्राईक करत पाकिस्तान हद्दीत घुसून दहशतवाद्यांचा खात्मा केला. त्यामुळे, चवताळलेल्या पाकिस्ताननेही प्रतिहल्ला करण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, या युद्धजन्य परिस्थितीमुळे दोन्ही देशाकडे जगाचे लक्ष लागले होते. त्यातच, भारताने पाकिस्तानसोबत क्रिकेट खेळू नये, असाही सूर यानिमित्ताने समोर आला.

मात्र, बीसीसीआयने परवानगी दिल्याने अखेर भारत विरुद्ध पाकिस्तान सामना झाला. आशियाच चषकातील तिन्ही सामन्यात भारताने पाकिस्तानला पराभूत केल्यानं पाकिस्तानी चाहते आणि पीसीबी देखील पाकिस्तान संघावर नाराज झाली आहे.

भारताविरुद्ध एकाही सामन्यात पाकिस्तानी संघाला विजय न मिळाल्याने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने टीम पाकिस्तानविरुद्ध काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. भारताविरूद्धचा पराभव जिव्हारी लागल्याने पीसीबीने टीम पाकिस्तानमधील खेळाडूंना झटका दिला असून त्यांचे अनापत्ती प्रमाणपत्र म्हणजेच निलंबित केले आहे. पाकिस्तानी मिडिया रिपोर्ट्स अन् तेथील क्रीडा पत्रकारांकडून ही माहिती समोर आली आहे.

एनओसीचा अर्थ असा आहे की, आता पाकिस्तानी खेळाडूंना देशातीलबाहेरील कुठल्याही टी-२० स्पर्धेत किंवा फ्रँचाईजी लिगमध्ये सहभाग घेता येणार नाही. त्यामुळे, पाकिस्तानी खेळाडू आता विदेशातील टी-२० स्पर्धेला मुकणार आहेत.

## आदित्यने केली सर्वाधिक १३ गुणांची कमाई | ९ व्या मिनिटालाच जयपूर पिंक पँथर्सचा ऑलआऊट

# पुणेरी पलटनचा जयपूरवर विजय



**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

प्रो कबड्डी लीग २०२५ स्पर्धेच्या १२ व्या हंगामातील ६३ वा सामना पुणेरी पलटन आणि जयपूर पिंक पँथर्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. मोहित गोयतने २ गुण घेत पुणेरी पलटनला हा सामना ४१- ३६ च्या फरकाने जिंकून दिला. चेन्नईतील एसडीएटी मल्टीपर्पज स्टेडियममध्ये पार पडलेल्या या सामन्यात पुणेरी पलटनकडून आदित्य शिंदेने सर्वाधिक १३ गुणांची कमाई केली. तर पंकज मोहितेने ८ गुण कमावले. जयपूर पिंक पँथर्सकडून अलीसमादीने सर्वाधिक २२ गुणांची कमाई केली. त्याने एकट्याने पूर्ण जोर लावला. या सामन्यातही पुणेरी पलटनचा कर्णधार अस्लम इनामदारचा सुरुवातीच्या ७ खेळाडूंमध्ये समावेश करण्यात आला नव्हता. पहिली चढाई करण्यासाठी आलेल्या पंकज मोहितेने १ गुण घेत पुणेरी पलटन संघाचं खातं उघडले. तर जयपूर पिंक पँथर्सकडून अलीसमादीने १ गुण घेत संघाचे खातं उघडले.

पूर्वार्धातील ९ व्या मिनिटाला पुणेरी पलटनने जयपूर पिंक पँथर्सला पहिल्यांदा ऑलआऊट केलं. यासह १२- ६ गुणांसह ६ गुणांची आघाडी घेतली.

उत्तरार्धातील सुरुवातीच्या १० मिनिटात जयपूर पिंक पँथर्स संघाचा बोलबाला पाहायला मिळाली. सुरुवातीच्या १० मिनिटात जयपूरने १३ तर पुणेरी पलटनला अवघे ५ गुण घेता आले. यासह गुणसंख्या ३०-२५ इतकी होती. पलटनकडे अवघ्या ५ गुणांची आघाडी होती. शेवटची ५ मिनिटे शिल्लक असताना पलटनकडे अवघ्या १ गुणाची आघाडी होती. जयपूर पिंक पँथर्सने १३ गुणांची आघाडी भरून काढत गुणसंख्या ३३-३३ ने बरोबरीत आणली. शेवटच्या चढाईत मोहित गोयतने २ गुण घेत हा सामना ४१-३६ ने जिंकून दिला.

# निषाद-सिमरनने जिंकले सुवर्ण

**नवी दिल्ली :** भारतीय खेळाडूंनी वर्ल्ड पॅरा थलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये शानदार कामगिरी करत पदकतालिकेत भारताला चौथ्या स्थानावर पोहोचवले आहे. निषाद कुमार आणि सिमरन शर्मा यांनी सुवर्ण पदक मिळवत भारताच्या विजयाच्या यादीत नवा अध्याय जोडला. याशिवाय प्रीती पाल आणि परदीप कुमार यांनी कांस्य पदक पटकावले. दिल्लीच्या सिमरन शर्माने महिलांच्या १०० मीटर टी१२ स्पर्धेत ११.९५ सेकंदांची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी करून सुवर्ण पटकावले. टी१२ गटात दृष्टीदोष असलेले खेळाडू भाग घेतात. २५ वर्षीय सिमरनने आपल्या गाईड उमर सैफी यांच्यासोबत धाव घेतली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)